




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २३.०६.२०२६ | अंक नं. ०७१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# सीना नदीच्या पूरनियंत्रण रेषेचे फेर सर्वेक्षण सुरू

## हजारो प्लॉटधारकांना दिलासा मिळण्याची शक्यता

नगर - शहरातून वाहणाऱ्या सीना नदीच्या पूरनियंत्रण रेषेमुळे (रेड आणि येलो लाईन) बाधित झालेल्या हजारो नागरिक आणि प्लॉटधारकांना दिला मिळण्याची शक्यता आहे. सीना नदीची हद्द निश्चिती आणि पूररेषेच्या फेर सर्वेक्षणाचे काम प्रत्यक्षात सुरु झाले आहे. यामुळे शहरातील रखडलेला पुनर्विकास आणि नवीन बांधकामांचा मार्ग मोकळा होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

भूमिअभिलेख विभागामार्फत २२ जूनपासून फेर सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यासाठी ७ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात ९ गावांमधील ८४ सर्व्हे नंबर निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये बोल्हेगाव, नागापूर, चाहुराणा बुद्रूक, चाहुराणा खुर्द, नालेगाव, भिंगार, कल्याण रोड, सावेडी आणि बुरुडगाव या गावांचा समावेश आहे. सध्या या सर्व्हे नंबरवर ट्रेसिंगसाठी पॉइंट घेण्याचे काम सुरू आहे. जुनी टिपणे आणि सध्याची प्रत्यक्ष हद्द यांची तुलना करून नदीचे नेमके क्षेत्र किती कमी-जास्त होणार, हे ठरवले जाणार आहे. यानंतर दुसऱ्या टप्प्यात नदीच्या पूर्व व पश्चिम बाजूला रेड लाईन (लाल रेषा) आणि येलो लाईन (निळी/पिवळी रेषा) यांचे मार्किंग केले जाणार आहे.



बोल्हेगाव परिसरात भूमिअभिलेख विभागामार्फत सीना नदीचे सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यात आले आहे.

अहिल्यानगर शहरातून सीना नदीचे सुमारे १४ किलोमीटरचे पात्र वाहते. शासनाच्या जुन्या आणि कडक निकषांमुळे नदीलगतच्या जवळपास ५०० मीटर परिसरामध्ये कोणत्याही पक्क्या किंवा व्यावसायिक बांधकामांना परवानगी मिळत नव्हती. यामुळे शहरातील सुमारे ३० टक्के क्षेत्रातील नागरिकांना स्वतःच्या घराची दुरुस्ती, पुनर्विकास किंवा नवीन खरेदी केलेल्या प्लॉटवर बांधकाम करता येत नव्हते. त्यामुळे या गंभीर समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सीना नदी पूरनियंत्रण रेषा विचार मंचची स्थापना करण्यात आली होती. या समितीने बैठका घेवून सीना नदीच्या पूरनियंत्रण रेषेचे फेरसर्वेक्षणाची मागणी लावून धरली. आ. संग्राम जगताप यांनीही शासन दरबारी पाठपुरावा करीत फेरसर्वेक्षण मुद्दा लावून धरला. अखेरीस शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात पूररेषेचे निकष शिथिल करण्याबाबत धोरणात्मक पाऊल उचलले आहे. यासाठी शासनाने फेर सर्वेक्षण आदेश काढले असून, एका १२ सदस्यीय तज्ज्ञ समितीची नियुक्ती केली आहे. ही समिती पूररेषेचे पुनर्मूल्यांकन करेल, सुरक्षेच्या धोक्यांचा आढावा घेईल आणि रखडलेले गृहप्रकल्प मार्गी लावण्यासाठी टीडीआर सारख्या पर्यायांसह आवश्यक नियमावलीत सुधारणा सुचवणार आहे.

पूररेषेच्या फेरसर्वेक्षणासोबतच सीना नदीच्या खोलीकरणाचे आणि रुंदीकरणाचेही काम सुरु आहे. त्यासाठी शासनाने २३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून सीना नदीच्या खोलीकरणाचे आणि रुंदीकरणाचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्णत्वाकडे जात आहे. यामुळे नदीची पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढेल आणि पुराचा धोका कमी होऊन पूरनियंत्रण रेषा अधिक सुरक्षित अंतरावर आणण्यास मदत होणार आहे.

### २०२२ मध्ये फेरसर्वेक्षणाचा आदेश निघाला अन् सरकार बदलले

तत्कालीन जलसंपदा राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या दालनात २०२२ मध्ये आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने बैठक झाली होती. यात आ. जगताप यांनी नदीपात्राच्या फेरसर्वेक्षणाचा मुद्दा लावून धरला होता. तसेच नागरिकांच्या समस्या आणि शहराचा रखडलेला विकास असे मुद्दे मांडून सरकारकडून फेरसर्वेक्षण मंजूर करुन घेतले होते. अखेरीस २५ मे २०२२ रोजी सरकारने फेर सर्वेक्षणाचा आदेश काढला होता. मात्र, त्यानंतर थोड्याच दिवसांत राज्यातील सत्ता बदल झाला आणि हा विषय रेंगाळला. दरम्यान सत्ता बदलानंतरही आमदार संग्राम जगताप यांनी पाठपुरावा थांबवला नाही. नुकतेच राज्याचे विद्यमान जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सीना नदीची प्रत्यक्ष पाहणी करुन या विषयाला गती दिली आहे. आता प्रत्यक्षात फेर सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे.


प्रॉपर्टी विषयी विश्वसनीय व्यवहारांसाठी...
तेजस कोठारी यांचे
नमीत प्रॉपर्टीज्
(नगर - पुणे - मुंबई - दुबई)
8421953963

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे
(आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421





जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## शहरात दहशत पसरवणाऱ्या विजय पठारे टोळीवर ‘मोक्का’ अंतर्गत कारवाई

नगर – शहरात सातत्याने दहशत निर्माण करणारा टोळीप्रमुख विजय राजू पठारे आणि त्याच्या टोळीतील पाच जणांवर पोलिसांनी अखेर 'मोक्का' अंतर्गत कडक कारवाई केली आहे. या टोळीने शहरात गंभीर गुन्हे करून कायदा व सुव्यवस्थेला आव्हान दिले होते.

मार्च महिन्यात सिव्हील हॉस्पिटलसमोर फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबाला अडवून, जुने भांडण मिटवण्याच्या बहाण्याने झेडपी कॉलनी येथे बोलावण्यात आले होते. तिथे मुख्य आरोपी विजय पठारे आणि त्याच्या साथीदारांनी फिर्यादींवर लोखंडी कोयता, तलवार आणि लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला केला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या टोळीवर अहिल्यानगरमधील तोफखाना, कोतवाली आणि भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यांच्या हद्दीत हत्येचा प्रयत्न, दरोडा, सरकारी कामात अडथळा आणणे, बेकायदेशीर शस्त्रे बाळगणे आणि महिलांशी गैरवर्तन करणे असे तब्बल १२ गंभीर गुन्हे दाखल आहेत. तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी या टोळीविरुद्ध मोक्का कारवाईचा प्रस्ताव पाठवला होता. नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

आता या टोळीतील प्रमुख आरोपी विजय राजू पठारे, अजय राजू पठारे, किरण मोहन जेधिया, सनी रणजित चावरे आणि निलेश बाबासाहेब ससाणे (सर्व राहणार मुन्सिपल कॉलनी, सिद्धार्थनगर, अहिल्यानगर) यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे करत आहेत.

## अखेर मान्सून दाखल, शहरासह जिल्ह्यात पाऊस सुरु



२३ जून रोजी अहिल्यानगर शहरात मान्सूनचा पाऊस पडला. (छाया – लहू दळवी)

नगर – एरव्ही ७ जूनला राज्यात दाखल होणारा मान्सूनचा पाऊस यंदा चांगलाच लांबला. त्यामुळे टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. राज्यात सर्वत्र मान्सूनची चातकासारखी वाट पाहिली जात होती. अखेर २३ जून रोजी महाराष्ट्रात सर्वत्र पाऊस झाला अन् हवामान विभागाने मान्सून राज्यात अधिकृतपणे दाखल झाल्याची घोषणा केली. अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी मान्सूनचा पहिला पाऊस बरसला आहे. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना आणि चातकासारखी पावसाची वाट पाहणाऱ्या बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे.

भारतीय हवामान विभागाने २३ जून रोजी नैऋत्य मान्सून महाराष्ट्रात अधिकृतपणे दाखल झाल्याचे प्रसिद्धीपत्रक काढून जाहीर केले आहे. २३ जून रोजी सकाळपासूनच मान्सूनचा पाऊस पडायला सुरुवात झाली. राजधानी मुंबईत सकाळपासूनच पावसाने चांगलाच जोर धरला असून सखल भागात मोठ्या प्रमाणात साचल्याचे दिसून आले. मुंबईसह महाराष्ट्राच्या अनेक भागांत मान्सूने जोरदार आगेकूच केली असून, अहिल्यानगर शहर आणि जिल्ह्यातही मान्सूनने दमदार हजेरी लावली आहे. अहिल्यानगर शहरात सकाळपासूनच ढगाळ आणि दमट वातावरण होते. आकाशात काळेकुट्ट ढग जमून येत होते. त्यानंतर दुपारच्या सुमारास जोरदार पावसाला सुरुवात झाली. शहरासह नगर जवळील विळद आणि देहेरे परिसरातही पावसाने जोरदार हजेरी लावली. पारनेर तालुक्यातील सुपा परिसर, नगर तालुक्यातील सारोळा कासार आणि वाळकी परिसरात जोरदार पाऊस झाला. तर, २२ जून रोजी संगमनेर आणि कोपरगाव तालुक्यांतही पावसाने जोरदार बॅटिंग केल्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

दुसरीकडे, पुण्यातही मान्सूनचा प्रचंड जोर पाहायला मिळत आहे. पुणे शहरात आणि ग्रामीण भागातही तुफानी पाऊस बरसला असून, जुन्नर तालुक्यातील कुमशेत परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याची माहिती समोर आली आहे. या मुसळधार पावसामुळे तेथील रस्ते, ओढे आणि नाल्यांना थेट नद्यांचे स्वरूप आले होते. कोकण किनारपट्टीवरील रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये कालपासूनच पाऊस पूर्णपणे सक्रिय झाला असून, पुढील काही दिवस संपूर्ण राज्यात पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज वर्तवला आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्याला मुसळधार पावसाचा इशारा

नगर – राज्यात मान्सून सक्रिय झालेला असतानाच आता हवामान विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचा इशारा जारी केला आहे. २३ जून रोजी संपूर्ण जिल्ह्याला मुसळधार पाऊस, सोसाट्याचा वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटाचा इशारा देण्यात आला असून नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

भारतीय हवामान विभागाने दुपारी जाहीर केलेल्या बुलेटीननुसार अहिल्यानगर जिल्ह्यात पुढील चार पावसाचे असणार आहेत. २४ ते २७ जून दरम्यान जिल्ह्यातील विविध भागांत वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यासह तुरळक ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची दाट शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. ऐन मान्सूनच्या सुरुवातीलाच विजांच्या कडकडाटासह येणाऱ्या या वादळी पावसामुळे नागरिकांनी, विशेषतः शेतकरी आणि ग्रामीण भागातील जनतेने झाडांखाली उभे न राहणे, विजेच्या खांबांपासून दूर राहणे तसेच जनावरांची सुरक्षित जागी व्यवस्था करणे यांसारखी आवश्यक ती सर्व काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

### पतीसह सहा जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल

नगर – पती आणि सासरच्या लोकांकडून होणाऱ्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून विवाहितेने माहेरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पीडितेच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरून पतीसह सासरच्या ६ जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिरदोस अल्ताफ सय्यद (वय ४५, रा. नुराणी कॉलनी, आलमगीर, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मुलगी सोनी उर्फ सना अनिस पठाण (वय २८) हिने १७ जून रोजी सायंकाळी माहेरी गळफास घेत आत्महत्या केली होती. तिचे लग्न झाल्यानंतर ती सासरी आणि माहेरी असतानाही सासरच्या लोकांकडून तिला सातत्याने त्रास दिला जात होता. तुला मूलबाळ होत नाही असे म्हणून सासरचे लोक तिची नेहमी हेटाळणी करत असत. तसेच तिला वेळोवेळी शिवीगाळ व दमदाटी करून तिचा मोठा मानसिक छळ केला जात होता. या सततच्या त्रासाला आणि छळाला कंटाळून अखेर तिने माहेरी येत आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले.

या प्रकरणी मयत सना हिचा पती अनिस सलीम पठाण, सासू सलीम पठाण, सासरे सलीम कादर पठाण, भाया शौकत सलीम पठाण व जाव मरियम शौकत पठाण (सर्व रा. येरवडा,पुणे) यांच्या विरुध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा तपास कॅम्प पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

## खोटा गुन्हा दाखल केल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक निलंबित

### विभागीय चौकशीही सुरू, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची कारवाई



राजेंद्र वाघ

नगर – पदाचा गैरवापर करत पैशांची मागणी करणाऱ्या आणि ते दिले नाहीत म्हणून खोटा गुन्हा दाखल करणाऱ्या स्थानिक गुन्हे शाखेच्या एका पोलीस उपनिरीक्षकाला अखेर निलंबित करण्यात आले आहे. राजेंद्र देवमन वाघ असे या निलंबित श्रेणी पोलीस उपनिरीक्षकाचे नाव असून, त्यांच्यावर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी ही कडक कारवाई केली आहे. विशेष म्हणजे कारवाई झालेले वाघ यांना पोलीस दलातील उत्कृष्ट कार्याबद्दल राष्ट्रपती पदकाने गौरविण्यात आलेले आहे.

काही दिवसांपूर्वी नेवासा पोलीस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यामध्ये दोघांची नावे हेतुपुरस्सर अडकवण्यात आली होती. पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांनी स्वतःच्या आर्थिक लाभासाठी बेकायदेशीरपणे हप्त्याची मागणी केली होती. परंतु, समोरच्या बाजूने हा हप्ता देण्यास नकार दिल्यामुळे चिडून वाघ यांनी हा खोटा गुन्हा दाखल केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या गंभीर प्रकारानंतर वाघ यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. चालू चौकशीच्या काळात त्यांनी पुराव्यांशी छेडछाड करू नये किंवा साक्षीदारांवर कोणताही दबाव आणू नये, यासाठी पोलीस अधीक्षकांनी त्यांना तात्काळ सेवेतून निलंबित केले आहे. निलंबन काळात वाघ यांना खाजगी नोकरी किंवा कोणताही व्यवसाय करता येणार नाही. जर त्यांनी असा प्रयत्न केला, तर त्यांचा उदरनिर्वाह भत्ता बंद करून त्यांच्यावर वेगळी कारवाई केली जाईल. असा इशारा या आदेशात देण्यात आला आहे. तसेच त्यांना अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात दररोज हजेरी लावण्याचे आणि दर शुक्रवारी कवायत मैदानावर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## भाड्याने नेलेल्या ट्रॅक्टरची परस्पर विल्हेवाट लावत फसवणूक

नगर – भाड्याने ट्रॅक्टर नेऊन त्याचे भाडे न देता आणि ट्रॅक्टरची परस्पर विल्हेवाट लावून एका व्यावसायिकाची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी शेवगाव येथील एकावर एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बापुसाहेब नानासाहेब शिंदे (वय ३४, रा. खांबे, ता. संगमनेर, हल्ली रा. चेतना कॉलनी, नवनागापूर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा जेसीबी, ट्रॅक्टर भाड्याने देण्याचा व्यवसाय आहे. त्यांच्या मालकीचा 'जॉन डिअर' कंपनीचा ट्रॅक्टर (क्र. एमएच १७ बीएक्स ४५२४) हा आरोपी मल्हारी गहिनीनाथ जायभाय (रा. थाटे, ता. शेवगाव) याने २३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास विजेच्या तारा ओढण्यासाठी नवनागापूर येथून भाड्याने घेतला होता.

आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून ट्रॅक्टर नेला, मात्र त्यानंतर ट्रॅक्टरचे ठरलेले भाडे न देता आणि ट्रॅक्टर परत न करता त्याची कोठेतरी परस्पर विल्हेवाट लावली. अनेक दिवस आरोपीशी संपर्क साधून आणि त्याच्या कडे ट्रॅक्टर परत करण्याची मागणी करूनही त्याने तो दिला नाही, त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर बापुसाहेब शिंदे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या फिर्यादी वरून एमआयडीसी पोलिसांनी आरोपी मल्हारी जायभाय याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास स.पो.नि. हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स.फौ. खेडकर करत आहेत.

## स्व. प्रा. शिरीष मोडक यांच्या शोकसभेचे २४ जूनला आयोजन

नगर – हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा.शिरीष मोडक यांचे रविवारी निधन झाले आहे. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हिंद सेवा मंडळाच्या वतीने २४ जून रोजी सायंकाळी ५ वाजता शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील पेमराज सारडा महाविद्यालयात ही शोकसभा होणार आहे, अशी माहिती हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी यांनी दिली.

## जिल्हा पोलीस दलातील ५८ अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या

### ३ पोलीस निरीक्षक, २१ सहायक पोलीस निरीक्षक आणि ३४ पोलीस उपनिरीक्षकांचा समावेश

नगर – जिल्ह्यातील महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांमध्ये नुकतेच बदल करण्यात आल्यानंतर आता जिल्हा पोलीस दलातील सेकंड अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी २२ जून रोजी आदेश काढत ३ पोलीस निरीक्षक, २१ सहायक पोलीस निरीक्षक आणि ३४ पोलीस उपनिरीक्षक अशा एकूण ५८ अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या आहेत.

दरम्यान, नव्याने जिल्ह्यात आलेल्या अधिकाऱ्यांना विविध पोलीस ठाण्यांमध्ये नेमणुका देण्यात आल्या असून काही अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्षभर मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी तसेच पोलीस प्रशासन अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने ही बदली प्रक्रिया राबविण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांचे नाव, कंसात बदली ठिकाण – पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ (द.वि.प. अहिल्यानगर), विजय देशमुख (जिल्हा विशेष शाखा), संतोष भंडारे (नियंत्रण कक्ष), सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर (राहुरी), सोमनाथ दिवटे (पारनेर), संदीप वसावे (नेवासा), पुनम श्रीवास्तव (कोतवाली), वर्षाबाई जाधव (जामखेड, मुदतवाढ), मंगेश गोटला (पाथर्डी), गणेश अहिरे (श्रीगोंदा, मुदतवाढ), रमीझ मुलाणी (वाचक शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय), अशोक काटे (कर्जत), गणेश जाधव (कर्जत), प्रदीप एकशिंगे (तोफखाना), शंकर मुटेकर (शेवगाव), विशाल चिटणीस (कोतवाली), रोहन खंडागळे (पाथर्डी), चेतन लोखंडे (श्रीरामपूर शहर), विकास ढोकरे (संगमनेर शहर), दीपक धनवटे (शनिशिंगणापूर), अजिनाथ कोठाळे (आर्थिक गुन्हे शाखा), नरहरी फड (आर्थिक गुन्हे शाखा), अजित मोरे (जामखेड), कल्पेशकुमार चव्हाण (शिर्डी),

पोलीस उपनिरीक्षक – आण्णासाहेब परदेशी (शहर वाहतुक शाखा, मुदतवाढ), प्रवीण पाटील (तोफखाना), सुरज मेढे (संगमनेर शहर), मनोहर खिळदकर (एमआयडीसी), मनोज आहिरे (राहुरी), विलास जाधव (शेवगाव), समाधान फडोळ (आश्वी), मनोज मोंढे (नगर तालुका), शितल मुगडे (श्रीरामपूर शहर), प्रदीप बोऱ्हाडे (शिर्डी), फराहनाज पटेल (संगमनेर तालुका), शलमोन सातपुते (अकोले), आशिष चौधरी (लोणी, मुदतवाढ), रंजीत मारग (पारनेर, मुदतवाढ), सचिन लिमकर (श्रीगोंदा, मुदतवाढ), कमलाकर चौधरी (कोपरगाव तालुका, मुदतवाढ), विकास जाधव (स्थानिक गुन्हे शाखा), कृष्णकुमार सेंदवाड (स्थानिक गुन्हे शाखा), मंगेश नागरगोजे (नगर तालुका), प्रवीण महाले (घारगाव), रोशन निकम (श्रीरामपूर शहर, मुदतवाढ), विनोद खांडबहाले (शेवगाव), प्रियंका आठरे (भरोसा सेल, मुदतवाढ), गजेंद्र इंगळे (कर्जत), संदीप मुरकुटे (पाथर्डी), दीपक मेढे (कोतवाली), महादेव गुट्टे (शिर्डी), अमोल गर्जे (एमआयडीसी), समाधान सोळुंके (कोतवाली), सुहास आव्हाड (भिंगार), संदीप दरवडे (स्थानिक गुन्हे शाखा), किशोर जाधव (सोनई), गणेश आघाव (जामखेड), किरण कोठुळे (सुपा).

## गुलमोहर रोडवरील तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

नगर – शहरातील गुलमोहर रोड परिसरात राहणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २२ जून रोजी पहाटे घडली आहे. साहिल सयाजी सुतार (वय २१, रा. शिला विहार, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

साहिल याने गळफास घेतल्याचा प्रकार लक्षात येताच त्याचे नातेवाईक यांनी त्याला तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन तोडमल यांनी त्यास तपासून औषधोपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास महिला पो. ना. जिजाबाई खुडे या करत आहेत.

## राजेंद्र राऊत यांचे अल्प आजाराने निधन



नगर – साईबन कॉलनी, पाईपलाईन रोड येथील रहिवासी सेवानिवृत्त नायब तहसीलदार राजेंद्र गणपत राऊत (वय ६२) यांचे २३ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, भाऊ, भावजया, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सुरेश मदनाल यांचे अल्प आजाराने निधन



नगर – शुभ वास्तु, लिंक रोड, कल्याण रोड येथील रहिवासी सुरेश नरसय्या मदनाल (वय ७०) यांचे २३ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष मदनाल यांचे ते वडील होत.

## नारायण रायकर यांचे हृदयविकाराने निधन



नगर – पिंपळगाव माळवी येथील रहिवासी नारायण सतु रायकर (वय ९०) यांचे २१ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पिंपळगाव माळवी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, ४ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. केशव व संतराम रायकर यांचे ते वडील होत.

## सर्जेपुरा येथे घरफोडी करणाऱ्या तिघांना पोलिसांनी ठोकल्या बेड्या; १.९० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

### आरोपींमध्ये एका अल्पवयीन मुलाचा समावेश



शहरातील सर्जेपुरा भागात घरफोडी करणाऱ्या आरोपींना पकडून त्यांच्याकडून हस्तगत केलेल्या मुद्देमालासह तोफखाना पोलिसांचे पथक.

नगर – शहरातील सर्जेपुरा भागातील एका घरफोडीच्या गुन्ह्याचा छडा तोफखाना पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने लावला आहे. पोलिसांनी याप्रकरणी एका अल्पवयीन मुलासह त्याच्या दोन साथीदारांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून चोरीला गेलेली १ लाख ९० हजार रुपये किमतीची सोन्याची लगड जप्त केली आहे.

३१ मे रोजी फिर्यादी सौ. स्वाती विशाल घुगरे (वय ३४, रा. सर्जे पुरा, अहिल्यानगर) या उन्हाळ्याचे दिवस असल्याने पहिल्या मजल्यावरील गॅलरीचा दरवाजा उघडा ठेवून कुटुंबासह झोपल्या होत्या. सकाळी उठल्यानंतर त्यांना बेडरूममधील कपाटातील साहित्याची उचकापाचक झालेली दिसली. कपाटात ठेवलेले सोन्याचे गंठण व कानातील टॉप्स असा एकूण १३ ग्रॅम वजनाचे दागिने चोरीला गेल्याचे लक्षात येताच त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

### सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे लागला सुगावा

गुन्हा दाखल झाल्यानंतर तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या आदेशाने गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी व बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, हा गुन्हा सिद्धार्थनगर येथील एका विधीसंघर्षित बालकाने केल्याचे निष्पन्न झाले. त्याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, त्याने आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिली.

पोलिसांनी या गुन्ह्यात सामील असलेल्या दुर्गेश चंद्रकांत चिंतामणी (वय २२, रा. म्हस्के यांचे इमारतीमध्ये, दाळमंडई, अहिल्यानगर), प्रकाश रावसाहेब उमाप (वय २८, रा. सिद्धार्थनगर, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर) या आरोपींना अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींकडून चोरीला गेलेल्या दागिन्यांची १ लाख ९० हजार रुपये किमतीची १३ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड पोलिसांनी हस्तगत केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पो.हे.कॉ. गणेश साठे करत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार नितीन उगलमुगले, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार, सुधीर खाडे, सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतिश त्रिभुवन, सुजय हिवाळे, भागवत बांगर, सतिश शिंदे, शाकीर सय्यद, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड, महिला पो.ना. जिजाबाई खुडे, दक्षिण मोबाईल सेल चे राहुल गुंडू, नितीन शिंदे, अरुण सांगळे यांच्या पथकाने केली आहे.

## मंडळ अधिकाऱ्याच्या नावाने ५ हजारांची लाच घेताना खाजगी इसमास ‘एसीबी’ ने रंगेहात पकडले

नगर – संगमनेर तालुक्यात नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मंडळ अधिकाऱ्याच्या नावाने ५ हजार रुपयांची लाच घेणाऱ्या एका खाजगी इसमाला रंगेहात पकडले आहे. २२ जून रोजी ही कारवाई करण्यात आली. नितीन किसन खर्डे (वय २९, रा. चंदनापुरी झोळे, ता. संगमनेर) असे आरोपीचे नाव असून त्याच्या विरुद्ध संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील तक्रारदार हे जेसीबी मशीनच्या साहाय्याने शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे सपाटीकरण करण्याचे काम करतात. ८ जून रोजी आरोपी नितीन खर्डे याने तक्रारदाराला तलाठी कार्यालय येथे बोलावून घेतले होते. तिथे मंडळ अधिकारी व तलाठी यांनी सदर कामाबाबत त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर तक्रारदार तलाठी कार्यालयाबाहेर जात असताना, खाजगी इसम नितीन खर्डे याने त्यांना गाठले. शेत जमिनीच्या सपाटीकरणाचे काम सुरळीत चालवण्यासाठी आणि कोणतीही अडचण न येण्यासाठी त्याने मंडळ अधिकारी यांच्याकरिता ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. इतकेच नव्हे तर, ही लाचेची रक्कम न दिल्यास तक्रारदारावर अवैध गौण खनिज उत्खननाचा गुन्हा दाखल करण्याची थेट धमकीही त्याने दिली.

या धमकीला न घाबरता तक्रारदाराने तातडीने नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेऊन तक्रार नोंदवली. पथकाने १९ जून रोजी केलेल्या पडताळणीत नितीन खर्डे याने तक्रारदाराकडे ५ हजार रुपयांची लाच मागितल्याचे आणि ती स्वीकारण्यास संमती दिल्याचे स्पष्टपणे निष्पन्न झाले.त्यानंतर २२ जून रोजी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून ५०० रुपयांच्या १० नोटांच्या स्वरूपात ५ हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारत असतानाच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने खाजगी इसम नितीन खर्डे याला रंगेहात पकडले.

पोलीस निरीक्षक श्रीमती रुपाली खांडवी, पोलीस हवादार संदीप वनवे आणि पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद पाळदे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## अपघाताच्या वादातून दोघांवर कोयत्याने जीवघेणा हल्ला; गुन्हा दाखल

नगर –बोल्हेगावच्या गांधीनगर भागात एका जुन्या अपघाताच्या वादावरून तरुणावर आणि त्याच्या चुलत भावावर कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना २१ जून रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास घडली. या प्रकरणी प्रसाद नरेंद्र ओव्हळ (वय २९, रा. बोल्हेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ओम देविदास डहाळे, चेतन संतोष सरोदे, यश रावसाहेब शिरसाठ (सर्व रा. अहिल्यानगर) आणि त्यांच्या एका अनोळखी साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी प्रसाद ओव्हळ हे टेम्पो चालक आहेत. २१ जून रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास ते गांधीनगर येथील मदिना मशिदीसमोर राहणाऱ्या आपल्या चुलत भावाला भेटण्यासाठी गेले होते. त्या वेळी आरोपींनी अपघाताची मोटारसायकल थांबवून ठेवल्याच्या कारणावरून वाद घालण्यास सुरुवात केली. या किरकोळ वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात झाले आणि आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या भावाला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

भांडण सुरू असतानाच आरोपींनी आपल्या जवळील धारदार कोयता काढून फिर्यादीचे चुलत भाऊ चैतन्य ओव्हळ यांच्यावर आणि फिर्यादीवर हल्ला केला. यामध्ये दोघेही जखमी झाले असून आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. हल्ला केल्यानंतर आरोपी ओम डहाळे आणि त्याचे साथीदार आपली मोटारसायकल घेऊन घटनास्थळावरून पसार झाले.या प्रकरणी पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ११५ (२), ३५२ आणि ३ (५) प्रमाणे गुन्हा नोंदवला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### रोज सकाळी अननस खाण्याचे लाभ

अननस हे दिसायला काटेरी पण आतून रसाळ आणि गुणकारी फळ आहे. सकाळी उपाशीपोटी अननस खाणे हे आयुर्वेदातही आरोग्यदायी मानले गेले आहे कारण रिकाम्या पोटी त्यातील पोषकतत्त्वे शरीरात लवकर शोषली जातात. अननसामध्ये 'ब्रोमेलिन' नावाचे महत्त्वाचे एन्झाइम असते जे अन्न पचवायला मदत करते, त्यामुळे सकाळी खाल्ल्यास दिवसभर अपचन किंवा गॅसचा त्रास होत नाही. यात भरपूर 'व्हिटॅमिन सी' असल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि वारंवार होणारी सर्दी–खोकला दूर राहतो. सांधेदुखी किंवा शरीरात कुठे सूज असेल तर अननस ती नैसर्गिकरित्या कमी करतो कारण ब्रोमेलिन जळजळ विरोधी काम करते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी सकाळचा अननस उत्तम आहे कारण तो मेटाबॉलिझम वाढवतो आणि पोट भरल्यासारखे वाटते. अननसात असलेले मँगनीज हाडांना बळकटी देते आणि म्हातारपणी होणारा हाडांचा ठिसूळपणा टाळतो. हे फळ नैसर्गिक डिटॉक्स म्हणून काम करते, यकृत स्वच्छ ठेवते आणि शरीरातील घाण बाहेर काढायला मदत करते. यातील फायबरमुळे पचनसंस्था सुरळीत चालते आणि रोज सकाळी पोट साफ होण्यास मदत होते, त्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो. डोळ्यांचे आरोग्य जपण्यासाठी अननसातील 'बीटा–कॅरोटीन' आणि 'व्हिटॅमिन ' उपयुक्त ठरतात आणि वयामुळे येणारे दृष्टीचे विकार लांबतात. रोज अननस खाणाऱ्यांची त्वचा तजेलदार राहते कारण 'व्हिटॅमिन सी' मुळे शरीरात कोलेजन तयार होते आणि सुरकुत्या उशिरा येतात.

## पाककला

### रसमलाई केक

**साहित्य :** मैदा, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा, दही, पिठीसाखर, तेल, दूध, केशर, वेलची पूड, फुल क्रीम दूध, साखर, व्हिपिंग क्रीम तयार, रसमलाई, पिस्ता, बदाम काप, वाळलेल्या गुलाब पाकळ्या

**कृती :** मैदा, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा एकत्र चाळून घ्या, दही, पिठीसाखर, तेल, दूध, केशराचे दूध, वेलची पूड फेटून घ्या आणि त्यात कोरडे मिश्रण मिसळा तयार बॅटर बेक करून केक गार करा. दूध आटवून रबडी बनवा व थंड करा केक आडवा कापून दोन्ही भागांवर रबडी लावा खालच्या भागावर फेटलेली क्रीम व रसमलाईचे तुकडे ठेवा वरचा भाग ठेवून संपूर्ण केकला क्रीम लावा रसमलाई पिस्ता बदाम व गुलाब पाकळ्यांनी सजवा आणि फ्रिजमध्ये सेट करून थंडगार सर्व्ह करा.

## वास्तू

### शुक्र ग्रहा संबंधी

* शुक्र पर्वत अंगठ्याच्या खाली असतो. हा भाग भरलेला व गुलाबीसर असेल तर शुक्र बलवान समजतात. शुक्र ग्रह ऐश्वर्य, सौंदर्य, प्रेम, कला, वैवाहिक सुख याचा कारक आहे. शुक्राचा रंग पांढरा आहे.

* घराच्या आग्नेय किंवा दक्षिण दिशेला पांढरी फुले लावावीत. मोगरा, जाई, जुई, चांदणी, निशिगंध ही रोपे कुंडीत लावा. बेडरूममध्ये ताज्या पांढऱ्या फुलांचा गुच्छ ठेवा. पांढरे पडदे, चादरी वापरा. शुक्रवारी लक्ष्मीची पूजा करून पांढऱ्या मिठाईचा नैवेद्य दाखवा.

## सौंदर्य

खायच्या पानाचा एक छोटा तुकडा चावून त्याचा रस चेहऱ्यावर लावा. पाच मिनिटांनी धुवा. पानात कात, चुना नसावा. फक्त पानाचा रस पिंपल्स सुकवतो आणि रंग सुधारतो.

## सल्ला

* डाळ शिजवताना त्यात हिंगाची फोडणी आधीच घाला. गॅस कमी लागतो आणि डाळ पोटाला हलकी होते.

* कुकरमध्ये भात चिकट होत असेल तर वरून ताटलीत थोडे मीठ ठेवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. २४ जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ शुक्लपक्ष, चित्रा १३।५९, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३५ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात नवीन वाट सापडेल. जुन्या मित्राची भेट होईल. पैशाची आवक वाढेल. संध्याकाळी प्रवास घडेल

**वृषभ :** कौटुंबिक आनंदाचे क्षण येतील. अडकलेले काम मार्गी लागेल. जमीन–घरासंबंधी बातमी मिळेल.

**मिथुन :** बोलण्यातून नवीन ओळख होईल. नोकरीत बदलाचे वारे दिसतील. लेखन–संवादात यश मिळेल.

**कर्क :** मन भावनिक राहील. घरात शुभ कार्य ठरेल. आईकडून लाभ होईल. जुनी आठवण ताजी होईल.

**सिंह :** मान–सन्मान वाढेल. सरकारी काम पुढे सरकेल. स्पर्धेत विजय मिळेल. वडिलांचे सहकार्य मिळेल.

**कन्या :** कामात तपशील महत्त्वाचा ठरेल. आरोग्याची स्थिती बदलेल. नोकरीत नवीन जबाबदारी येईल. कर्ज फेडले जाईल.

**तूळ :** भागीदारीतून फायदा होईल. जोडीदाराची साथ मिळेल. कलेच्या क्षेत्रात नाव होईल. प्रवासातून लाभ होईल.

**वृश्चिक :** गुप्त शत्रू समोर येईल. कष्टाचे फळ हातात पडेल. कोर्ट–कचेरीचे काम हालेल. जुना वाद संपेल.


**धनु :** नशिबाची साथ मिळेल. धार्मिक स्थळी जाणे होईल. मुलांकडून आनंद मिळेल. उच्च शिक्षणात यश येईल.

**मकर :** कामाचा व्याप वाढेल. वडिलांशी बोलणे होईल. जमीनसंबंधी कागद मिळेल. थकवा जाणवेल.

**कुंभ :** मित्रांची संख्या वाढेल. नवीन योजना सुरू होईल. अचानक लाभ होईल. समाजात चर्चा होईल.

**मीन :** स्वप्न सत्यात उतरेल. पैशाचा ओघ सुरू राहील. प्रेमात गोडवा येईल. परदेशाशी संबंध येईल.


## शब्दगंध क्र. ७४५८ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** अरण्य, वन–कानन: कांतार ३) समान नसलेले ६) बागकाम करणारा; माळी; फुलधर ७) दफनभूमी ८) शरीरातील त्रिदोषांपैकी एक; खोकला १०) दगड, वीट; धोंडा ११) नसणारा; अनवश्य १४) मुस्लीम पुरुषाचे एक नाव १६) झाडावरून आपोआप गळून पडलेले फळ १७) दलाली १८) गोष्टीतील चाळीस चोरांचा नायक २०) अपुरा; अपूर्ण; आखुड २१) दानधर्म करणारा २२) समान; सोबत; सम; साथ; सह

**उभे शब्द :-** २) गलका, गोंधळ, गडबड ३) एक आंबटगोड फळ ४) पाढ्यातील सहाची संज्ञा ५) मारणारा; हानिकारक ६) जम ७) कपड्यावर वगैरे केलेली कलाकुसर ९) मुस्लीम साधू १२) लागलीच; त्वरित १३) ज्वारी वगैरे पिकाचे कणसे काढल्यानंतर राहिलेले व वाळलेले धाट किंवा ताट १५) सोम; चंद्र; शशी १६) हिलाल, दिवटी १८) उत्पन्न; प्राप्ती; अभिनय १९) गोष्ट; कलम

### शब्दगंध क्र. ७४५७ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** रक्ताचं नातं तोडता येतं, पण माणुसकीचं नातं जोडलं की जन्मभर साथ देतं.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सावली काळीच का असते? रंगीत का नाही?

आपण लहानपणापासून सावलीशी खेळत आलो आहोत. उन्हात गेलो की आपलीच आकृती जमिनीवर सोबत चालते आणि आपण तिला पकडायचा प्रयत्न करतो. पण कधी निरखून पाहिले आहे का की ही सावली नेहमी काळीच का असते? झाड हिरवे असते, फूल लाल असते, आकाश निळे असते, मग सावलीला स्वतःचा रंग का नसतो? हा प्रश्न साधा वाटला तरी त्यामागे प्रकाशाचे खूप सुंदर विज्ञान दडले आहे. रंग दिसण्यासाठी जगात सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रकाश. प्रकाश नसेल तर कोणताच रंग अस्तित्वात येऊ शकत नाही. सूर्याचा पांढरा प्रकाश खरे तर सात रंगांनी मिळून बनलेला असतो हे आपल्याला इंद्रधनुष्य पाहिल्यावर कळते. जेव्हा हा प्रकाश एखाद्या वस्तूवर पडतो तेव्हा ती वस्तू काही रंग शोषून घेते आणि जो रंग तिला नको असतो तो परावर्तित करते.

आपल्या डोळ्यांपर्यंत जो रंग परावर्तित होऊन येतो तोच आपण त्या वस्तूचा रंग म्हणून ओळखतो. उदाहरणार्थ, गुलाबाचे फूल लाल दिसते कारण ते पांढऱ्या प्रकाशातला फक्त लाल रंग परत पाठवते आणि बाकीचे सहा रंग स्वतःमध्ये सामावून घेते. आता सावलीकडे पाहू. सावली म्हणजे नेमके काय? तर प्रकाशाच्या वाटेत आलेला अडथळा. जेव्हा तुम्ही उन्हात उभे राहता तेव्हा तुमचे शरीर सूर्याचे किरण अडवते. तुमच्या शरीराच्या मागे जिथपर्यंत ते किरण पोहोचू शकत नाहीत ती संपूर्ण जागा म्हणजे तुमची सावली. थोडक्यात सांगायचे तर सावली ही 'प्रकाश नसलेली जागा' असते. जिथे प्रकाशच पोहोचत नाही तिथे कोणत्याच रंगाचे परावर्तन होणार नाही. परावर्तन झाले नाही तर डोळ्यांपर्यंत रंगाची माहितीच जाणार नाही. आणि जिथे रंगाची माहितीच पोहोचत नाही त्या भागाला आपला मेंदू 'काळा' असे नाव देतो. कारण काळा हा स्वतंत्र रंग नसून रंगाचा अभाव आहे.

पूर्ण काळोख्या खोलीत डोळे उघडे ठेवले तरी सगळे काळेच दिसते, अगदी त्याच नियमाने सावली काळी दिसते. म्हणूनच सावली म्हणजे प्रकाशाचा अभाव, आणि अभावाला स्वतःचा रंग नसतो. आता तुम्ही म्हणाल की सावली नेहमी गडद काळी का दिसत नाही? कधी कधी ती फिकट राखाडी दिसते. त्याचे कारण असे की आपल्या अवतीभवती फक्त एकच प्रकाश स्रोत नसतो. सूर्याचा थेट प्रकाश जरी वस्तूने अडवला तरी आजूबाजूच्या भिंती, जमीन, हवेतील धूलिकण यांच्यावरून विखुरलेला प्रकाश थोडा–थोडा सावलीच्या भागात पोहोचतो. या विखुरलेल्या प्रकाशाला 'परिवेशी प्रकाश' म्हणतात. त्यामुळे सावलीत पूर्ण अंधार न होता थोडा उजेड येतो आणि ती गडद काळी न दिसता राखाडी दिसते. रात्रीच्या चंद्रप्रकाशात सावल्या जास्त गडद दिसतात कारण तेव्हा परिवेशी प्रकाश खूप कमी असतो. मग सावली कधीच रंगीत होऊ शकत नाही का? तर हो, होऊ शकते, पण त्यासाठी प्रयोग करावा लागतो.

जर आपण एका खोलीत एक लाल रंगाचा बल्ब आणि एक हिरव्या रंगाचा बल्ब लावला आणि मधे हात धरला तर दोन सावल्या तयार होतील. जिथे हाताने लाल प्रकाश अडवला तिथे फक्त हिरवा प्रकाश शिल्लक राहील, म्हणून ती सावली हिरवी दिसेल. आणि जिथे हिरवा प्रकाश अडला तिथे लाल सावली तयार होईल. नाटकात किंवा स्टेज शोमध्ये असे रंगीत दिवे वापरून जाणूनबुजून रंगीत सावल्या तयार करतात. पण नैसर्गिक सूर्यप्रकाशात फक्त एकच मुख्य पांढरा स्रोत असतो. तो अडवला की मागे कोणताच दुसरा रंगीत प्रकाश उरत नाही, फक्त अंधार उरतो. म्हणून आपली रोजची सावली, झाडाची सावली, घराची सावली या सगळ्या रंगहीन म्हणजेच काळ्या दिसतात. थोडक्यात सांगायचे तर सावली ही कोणतीही वस्तू नाही, ती फक्त प्रकाशाने काढलेली रिकामी जागा आहे. आणि रिकाम्या जागेला, पोकळीला, अंधाराला स्वतःचा रंग नसतो. म्हणूनच लहानपणापासून आजपर्यंत आपण पाहत आलेली सावली सदैव बिनरंगी, म्हणजेच काळी असते आणि पुढेही तशीच राहणार आहे.

### स्वार्थ

एकदा एका लहानशा गावात रामा नावाचा शेतकरी राहत होता तो दिसायला चांगला होता पण मनात नेहमी स्वार्थ भरलेला असे त्याच्या घराशेजारी पार्वती नावाची एक म्हातारी आजी एकटीच राहत होती आजीचा नवरा वारला होता आणि मुलगा शहरात नोकरीला होता आजीजवळ दोन एकर शेती होती आणि एक कपिला गाय होती गाय रोज भरपूर दूध द्यायची आणि शेतीत चांगले पीक यायचे रामाला ती शेती आणि गाय हवी होती तो रोज विचार करायचा की ही म्हातारी एकटी आहे हिला फसवले तर सगळे आपल्यालाच मिळेल एका हिवाळ्यात आजीला खूप ताप आला ती अंथरुणातून उठू शकत नव्हती रामाने संधी साधली आणि तो आजीच्या घरी गेला गोड बोलून म्हणाला आजी तू खूप आजारी आहेस वैद्य म्हणाला तुझा शेवट जवळ आला आहे तुझ्यानंतर ही शेती वाया जाईल त्यापेक्षा माझ्या नावावर करून दे मी तुझी मुलासारखी सेवा करीन आणि तुझ्या नावाने अन्नछत्र चालवीन आजी भोळी होती तिने रामावर विश्वास ठेवला तिने तलाठ्याला बोलावून अंगठा दिला रामाने लाच देऊन खोटे कागद बनवले शेती स्वतःच्या नावावर करून घेतली काम झाले की त्याने आजीला घरातून हाकलून दिले.

कपिला गाय बाजारात नेऊन विकली आजी रडत रडत मंदिराच्या पायरीवर जाऊन बसली इकडे रामा श्रीमंत झाला त्याने मोठे घर बांधले बैलजोडी घेतली गावात तो शेठ म्हणून मिरवू लागला लोकांना वाटले रामाने कष्टाने प्रगती केली कोणालाच त्याचे खोटे कळले नाही पण कर्म कोणाला सोडत नाही एका आषाढी रात्री काळ्या ढगांनी आकाश भरले सोसाट्याचा वारा सुटला आणि विजा कडाडू लागल्या रामाच्या नवीन घरावर मोठी वीज कोसळली घराला आग लागली आणि सगळे धान्य जळून राख झाले त्याच वेळी नदीला पूर आला पुराचे पाणी शेतात शिरले आणि उभे पीक वाहून गेले बैलजोडी सुद्धा पाण्यात वाहून गेली सकाळपर्यंत रामाकडे फाटकी धोतराशिवाय काही उरले नाही गावकऱ्यांनी मदत केली नाही कारण त्याचा स्वभाव सगळ्यांना कळला होता रामाला भीक मागायची वेळ आली तो गावोगावी फिरू लागला.

एक दिवस श्रावण महिन्यात तो मंदिरात गेला तिथे तीच पार्वती आजी दिसली आजीने त्याला ओळखले पण राग केला नाही तिने पदरातली भाकरी काढून रामाला दिली आणि पाणी दिले रामा ढसाढसा रडू लागला तो आजीच्या पाया पडला आणि म्हणाला मी स्वार्थासाठी खोटे बोललो तुला फसवले त्याची ही शिक्षा देवाने दिली आजी फक्त हसली आणि म्हणाली बाळा अजून वेळ गेली नाही चूक कळली हेच महत्त्वाचे आहे.

रामाने त्या दिवसापासून मेहनत करायला सुरुवात केली तो शेतावर मजुरी करू लागला हळूहळू लोकांचा विश्वास परत मिळवला काही वर्षांनी त्याने स्वतःची थोडी शेती घेतली पण या वेळी त्याने कधीच खोटे बोलले नाही आजी शेवटपर्यंत मंदिरात राहिली. रामा रोज तिला जेवण देऊन मग स्वतः जेवत असे.

बोध : स्वार्थासाठी खोटे बोलून मिळवलेली गोष्ट कधीच टिकत नाही दुसऱ्याच्या डोळ्यातील पाणी शाप बनून परत येते.

## आत्मशक्ति



### आत्मज्ञान

ह्या दोन्ही गोष्टी एकच आहेत असे आम्ही समजता कामा नये! आम्ही जेव्हा आमच्या आत्महाकेला साद देऊ तेव्हा संसारातील सर्व अडचणींना आम्ही जोरदारपणे अगदी पूर्ण विश्वासाने तोंड देऊ शकतो. कारण तोपर्यंत आमच्या बाबतीत घडणाऱ्या घटनांचा अर्थ आम्हाला नीट समजून आलेला असेल. आपल्याबाबत हे कसे काय घडते हे समजून येईल.

आत्मिक ज्ञान आणि बौध्दिक ज्ञानामध्ये किती अंतर आहे ?

आत्मज्ञान समजून घेण्याचा अभ्यास करतांना, बाह्य ज्ञान आणि आंतरिक ज्ञानांत काय फरक आहे, हे आपल्याला कळून येते. ह्या दोन्ही घटनांत मुलभूत फरक आहे.

मन साऱ्या गोष्टींकडे आपल्या दृष्टीने बघते परंतु आत्मदृष्टी एखाद्या स्वच्छ आरशाच्या दृष्टीने सर्वांकडे पाहते अहंकार हा स्वतःसाठी सेवा घेण्याची इच्छा करतो, ह्या गोष्टीत माझ्यासाठी काय आहे? मला जे हवे आहे ते येथून मिळेल का? आम्ही दुसऱ्यावर विजय मिळवू शकू काय ?

पण आत्मा मात्र अगदी खऱ्या दृष्टीने 'प्रेम, अहिंसा, नम्रपणा, पावित्र्य आणि निष्काम सेवा, ह्यांची इच्छा करतो.' आणि ह्याच कसोटीवर, आमच्या मनात जो काय विचार येईल त्याची शहानिशा करतो. जेव्हा मन, अहंकार जे काय बोलेल तो स्वतःचे भले इच्छितो मग त्याचा दुसऱ्यावर काहीही परिणाम होवो !

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### आपले विचार

शिवानीदीदी मग आपण चांगल्या गोष्टी लक्षात का नाही ठेवत ? आपल्या सगळ्यांकडेच आणखी एक जुना संस्कार आहे नकारात्मक गोष्टींनाच धरून ठेवतो. आपण फक्त त्याच आठवतो आणि पूर्वी आपण आयुष्यातल्या फक्त संवादात अनुभवलेला चांगुलपणा विसरून जातो. जर आपल्याला नक्कलच करायची असेल तर लोकांच्या चांगल्या वागण्याची करू या.

सुरेश ओबेरॉय : आता मी तुमच्याशी सहमत आहे. आपल्याला अमर्यादित व्हावंच लागेल.

शिवानीदीदी :

तुम्ही स्वत:ला कमी मानलंत तर तुमच्या शक्तीत अडथळा येईल. जर तुम्ही जुन्या चौकटीला छेद दिलात, भूतकाळ विसरलात तर तुम्हाला म ोकळं वाटेल आणि तुम्ही कार्यक्रमाचा आनंद घेऊ शकाल.

सुरेश ओबेरॉय : मी आधीपासूनच आनंद अनुभवतोय, तुमच्याशी संवाद साधल्यावर मला आतमध्ये हलकं हलकं वाटतंय.

शिवानीदीदी : तुमचं स्वत:बरोबरचं नात बदलल्यामुळे तुम्हाला हलकं वाटत आहे. आपलेच विचार आपल्याला हलकं करतात आणि त्यांच्यामुळेच मन जड होतं. आपणच आपला मित्र बनलं पाहिजे. आपल्या मनाला आपला मित्र बनवलं पाहिजे.

सुरेश ओबेरॉय : माझ्या मनाला माझा मित्र बनवल्याबद्दल धन्यवाद शिवानीदीदी.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सासू : जावईबापू, कायमचेच इथे राहा की. घरजावई व्हा.

जावई : नको सासूबाई, मग तुम्ही मला 'जावई' म्हणणार नाही, 'नोकर' म्हणाल.

सासू : अहो, नोकराला पगार द्यावा लागतो. जावयाला फक्त 'टोमणे' फ्री द्यायला मिळतात.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'वाघ' हा कोणत्या राज्याचा राज्यप्राणी आहे?

– महाराष्ट्र, मध्य प्रदेश, पश्चिम बंगालसह अनेक राज्यांचा.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### पावटा

पावटा ही वनस्पती शेंगवेल या प्रकारात मोडते. पावट्याच्या हिरव्यागार शेंगा भाजीसाठी उपयोगात आणल्या जातात. मराठीत 'पावटा', संस्कृतमध्ये 'निष्पाव', इंग्रजीमध्ये 'हायशिन्थबेन', तर शास्त्रीय भाषेत 'डॉलिकॉस लाबलाब' (Dolichos Lablab) या नावाने ओळखली जात असून, ती 'पॅपिलिओनसी' या कुळातील आहे. पावटा या वनस्पतीच्या वेलीची फुले जांभळी किंवा पांढऱ्या रंगाची असतात. त्याची पाने ही लांब दांड्याची असतात. पावट्याचा देठ लांब, मऊ असतो. पावटा वेलाची लागवड भाजी उत्पादनासाठी संपूर्ण भारतात केली जाते. शेतामध्ये, घराजवळ, तसेच घराजवळील परसबागेमध्ये याचे उत्पादन घेतले जाते. खाण्यासाठी भाजी म्हणून पावट्याचा उपयोग केला जातो. त्याचबरोबर त्याम ध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत.

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : पावटा हा दीपक, पाचक, बलकर, वेदनाशामक, स्तंभक व ज्वरघ्न आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : पावट्यामध्ये लोह, कॅल्शिअम, फॉस्फरस, प्रथिने, आर्द्रता, तंतुमय, पिष्टमय पदार्थ, 'ब' व 'क' जीवनसत्त्वे भरपूर प्रम ाणात असतात. त्याच्यामध्ये असणाऱ्या या औषधी गुणधर्मामुळेच त्याचा वापर विविध आजारावर केला जातो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००



अहिल्यानगर जिल्हा अजिंक्यपद व जिल्हा निवड चाचणी बॅडमिंटन स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंसमवेत त्यांचे मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे.

# रायसोनी मेमोरियल जिल्हा बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत विधी सैनी व कुक्कडवाल यांनी पटकावले तिहेरी विजेतेपद

नगर – अ.नगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने आयोजित योनेक्स सनराईज प्रेझेंट्स जी. एच. रायसोनी मेमोरियल अहिल्यानगर जिल्हा अजिंक्यपद व जिल्हा निवड चाचणी बॅडमिंटन स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेत विधी सैनी आणि राजवीर कुक्कडवाल यांनी तिहेरी विजेतेपद पटकावत विशेष लक्ष वेधले. वाडियापार्क क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल येथे झालेल्या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, बॅडमिंटन हा खेळ केवळ राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी न खेळता छंद म्हणून जोपासला गेला पाहिजे. अनेक खेळाडू राष्ट्रीय प्रमाणपत्र मिळाल्यानंतर खेळापासून दूर जातात. त्यामुळे राज्य आणि देशाला आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू मिळण्यात अडचणी येतात. बॅडमिंटन हा खेळ छंद म्हणून जोपासल्यास आरोग्य सुदृढ राहण्याबरोबरच सक्षम खेळाडू निर्माण होतील, असे त्यांनी सांगितले. तसेच जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनने विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन करून खेळाडूंना चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचेही त्यांनी नमूद केले.

समारंभाला पुणे रायसोनी कॉलेजचे प्राचार्य एच. आर. कुलकर्णी, अहमदनगर डिस्ट्रिक्ट बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव मिलिंद कुलकर्णी, खजिनदार राहुल मोटे, सदस्य डॉ. भूषण अनुभुले, चेतन बोगावत, राज्य क्रीडा प्रशिक्षक विशाल गर्जे तसेच प्रमुख पंच ऋषिकेश कुलकर्णी उपस्थित होते.

एच. आर. कुलकर्णी यांनी रायसोनी फाउंडेशन सातत्याने क्रीडा संस्कृतीला पाठबळ देत असल्याचे सांगितले. या निवड चाचणी स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार असून त्यांचे भवितव्य उज्ज्वल असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मिलिंद कुलकर्णी यांनी सांगितले की, जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना संधी व प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने असोसिएशनकडून विविध स्पर्धांचे नियमित आयोजन केले जाते. यंदाच्या स्पर्धेलाही खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रायसोनी मेमोरियल फाउंडेशन आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे स्पर्धेसाठी विशेष सहकार्य लाभल्याचे त्यांनी नमूद केले.

विधी सैनी आणि राजवीर कुक्कडवाल यांनी तिहेरी विजेतेपद पटकावत विशेष लक्ष वेधले. १९ वर्षांखालील मुलींच्या एकेरी, १७ वर्षांखालील मुलींच्या एकेरी आणि १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरी गटात विधी सैनी विजेती ठरली. तर राजवीर कुक्कडवाल याने १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरी व दुहेरी गटासह खुल्या पुरुष दुहेरी गटात विजेतेपद मिळवून तिहेरी यश संपादन केले.

स्पर्धेतील अन्य निकालात १९ वर्षांखालील मुलींच्या दुहेरीत अनन्या सोले व भूमी डागा, मुलांच्या दुहेरीत नील पितळे व राजवीर कुक्कडवाल, १७ वर्षांखालील मुलींच्या दुहेरीत भूमी डागा व साची आगरवाल, मुलांच्या दुहेरीत आयान बैस व विराज गाडेकर, १३ वर्षांखालील मुलींच्या एकेरीत श्रावणी वीरकर, मुलांच्या एकेरीत शर्विल काळे, ११ वर्षांखालील मुलींच्या एकेरीत विधी ठोंबरे, मुलांच्या एकेरीत स्वरूप मांडे, खुल्या महिला दुहेरीत सायली माने व श्रद्धा मलिक, महिला एकेरीत भव्या रसाळ आणि खुल्या पुरुष एकेरीत नील पितळे यांनी विजेतेपद पटकावले.

स्पर्धेचे मुख्य पंच म्हणून आदिती चौगुले (पुणे), दर्शन बावणे (बुलढाणा) आणि अनुराधा माथेसुळ (अहिल्यानगर) यांनी काम पाहिले. प्रमुख पंच म्हणून ऋषिकेश कुलकर्णी यांनी जबाबदारी सांभाळली. सूत्रसंचालन आदिती चौगुले यांनी केले. डॉ. भूषण अनुभुले यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अंतरात्मा सहाय्याला तत्पर

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स



डॉ. मधुकर अष्टीकर लिखित नंदादीप प्राजक्ता ९८९०९५६६९५

विजयाकडे मनाचा ओढा, पण कचखाऊ दुबळ्या विचारांनी घातला आहे मनाला वेढा. पण का व्हावी अशी अवस्था ? संशय आणि शंका यांनी काजळली आहे बुद्धी आणि मेधा. केवळ विचारांनी नव्हे, तर विकारांनी मन झाले द्विधा.

बा माणसा, टाक दुबळेपण. दे हाक तुझ्या अंतरात्म्याला. जागव तुझ्या आत्मबलाला. ऐक ती तुझ्या अंतरात्म्याची हाक. तो म्हणतो आहे, आालोय मी घाबरु नकोस. दुष्ट शक्तींचा नाश करणारा बलवंत मी, आलोय. कर्तुमकर्तुम सामर्थ्य माझं. मग कशाला वाहतोस हे काळजीचं, दुःखाचं ओझं ? तुझं चित्त आता माझ्या हाती. फोडू नको तुझ्या अपयशाचं खापर दैवाच्या माथी, कारण तूच निर्माता आहे तुझ्या दैवाचा. तू विसरलास ते? दुष्टांच्या संहाराचं व्रत घेतले आहेस तू. व्रत पाळायला भीत आहेत तू. आता मी तेही घेतलंय माझ्या हाती. तुझी बुद्धी, मेघा, प्रतिभा, स्मृती आणि प्रकृती यांच्याशी संवाद साधणं तू केलं नाहीस का? आता तो संवादही मी करेन.

तेव्हा बा माणसा, समस्या उभी झाली, की करावे आवाहन त्या अंतरात्म्याला. तो तत्परच असतो सहाय्याला. तू मायेत गुंततोस. आत्मबलाला विसरतोस. दुष्टांच्या संगतीत रमतोस. दुबळा आणि नेभळट होतोस. दुष्टांचे बळ दिखाऊ असते. लोकांवर ते आपलीच गर्विष्ट छबी उगाच लादत असते. सोडावा दुष्टांचा संग, आठवावा अंतरंगातील श्रीरंग, मग कसा होईल मनोभंग?

सदबुद्धी, सत्प्रवृत्ती आणि सत्कर्मीरती, हीच अंतरात्म्याच जागृती. असा अंतरात्मा जागा झाला, की दुःखाला कुठली जागा ?

एक होते छोटे गाव. त्याला लागून एक पर्वत. त्यावर खूप जंगल. वाटायची भीती. गावचे लोक घाबरायचे पर्वतावर जायला. त्यात एकदा त्या पर्वतावर एक घंटा वाजू लागली. पर्वतावर आणि कर्णकर्कश घंटेचा नाद ? लोक म्हणाले, एवढ्या किर्र जंगलात हा राक्षसानेच केलेला आहे घंटानाद, त्या राक्षसाचे नावही ठेवले त्यांनी घंटानाद. मग गाव भयाने पछाडला. लोक घराबाहेर पडायला भिऊ लागले.

पण त्यात एक निघाला हिमतीचा. त्याने जागवले आत्मबलाला विचारांन्ती पटले, की, कुठला राक्षस अन कुठला काय ? आणि तो राक्षस खरंच असेल, तर काय नुसता घंटा वाजवत बसेल? पण लोकांना ते पटेना.

मग तो लोकांना म्हणाला, मी मारतो त्या राक्षसाला ? आणतो ती त्याची घणाणती घंटा. अंतरात्मा म्हणालाच त्याला, की हे नुसते भय कशाला? तो पर्वतावर गेला. जाताना एक चोर भेटला. म्हणाला, दया करा. वानरांच्या हाती पडलेली सोन्याची घंटा गिळवून द्या. मला ती पुन्हा देवळात लावायचीच. देवाची घंटा चोरल्यापासून माझ्यावर संकटंच आली आहेत. पण ही वानरं घंटा सोडत नाहीत. अंगावर धावून येतात. घंटा त्यांनी घेतलीय. वाजवतात केव्हाही.

मग त्या हिंमतवाल्याने फुटाणे आणले. वानरांकडे फेकले. फुटाणे पर्वतभर पसरले. वानरे घंटा सोडून फुटाण्यांकडे वळली. घंटा हिंमतवाल्याने उचलली. गावात आणली. देवळात घंटा बसविली. चोराने लोकांची क्षमा मागितली. लोकांची भीती गेली.

– किशोर गांधी

# सुरक्षित, सुसज्ज आणि अद्ययावत वस्तीगृह उभारण्यासाठी अहिल्यानगरमध्ये जागा द्यावी

नगर – ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी शहरात येताना निवासाच्या अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्यासाठी सुरक्षित, सुसज्ज आणि अद्ययावत वस्तीगृह उभारण्यासाठी जागा देण्याची मागणी माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. नगर शहरालगत १० ते १५ गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी पद्मश्री पोपटराव पवार यांची उपस्थिती होती. तसेच माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, संचालिका वैशाली दारकुंडे, प्रा. सुधाकर सुंबे आदी पदाधिकारी यांनी या प्रश्नाबाबत आमदार जगताप यांचे लक्ष वेधले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे हजारो शिक्षक सभासद राज्यभर कार्यरत आहेत. त्यांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी अहिल्यानगर शहरात येणे आवश्यक ठरते. मात्र अनेक शिक्षक कुटुंबांकडे शहरात स्वतःची राहण्याची व्यवस्था नसल्याने विद्यार्थिनींना सुरक्षित निवासाचा प्रश्न भेडसावत असतो. खासगी वसतिगृहे



ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना अद्ययावत वस्तीगृह उभारण्यासाठी जागा देण्याची मागणी माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

आणि भाड्याच्या घरांचा वाढता खर्चही पालकांसाठी आर्थिक भार ठरत असून, शिवाय सुरक्षिततेची हमी नसते.

विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरणात राहण्याची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी माध्यमिक शिक्षक सोसायटीने स्वतंत्र वस्तीगृह उभारण्याचा संकल्प केला आहे. या वस्तीगृहामध्ये आधुनिक सुविधा, सुरक्षित निवास, अभ्यासिका, ग्रंथालय तसेच विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या प्रकल्पासाठी नगर शहराच्या लगत असलेल्या मोकळ्या जागेत १० ते १५ गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे करण्यात आली. शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थिनींना यामुळे मोठा आधार मिळेल तसेच त्यांच्या पालकांनाही दिलासा मिळणार असल्याचे सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थितांनी मुलींच्या शिक्षणासाठी सुरक्षित निवास व्यवस्था ही काळाची गरज असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थिनींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी अशा वस्तीगृहांची आवश्यकता असून, हा प्रकल्प सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# सावेडीत ‘राठोड आय अॅण्ड चिल्ड्रन हॉस्पिटल’चे उद्घाटन

**निरोगी बालपण आणि स्पष्ट दृष्टीसाठी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा एकाच छताखाली; आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते लोकार्पण**

नगर –अहिल्यानगरमधील नागरिकांना निरोगी बालपण आणि स्पष्ट दृष्टी देण्यासाठी सर्व सुविधायुक्त आणि विश्वासाचे अत्याधुनिक ’राठोड आय अॅण्ड चिल्ड्रन हॉस्पिटल’ नगरकरांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहे. सावेडी उपनगरातील एकवीरा चौक रस्त्यावरील कोहिनूर मंगल कार्यालयाशेजारी या अद्ययावत हॉस्पिटलचा शुभारंभ नुकताच झाला. या प्रशस्त हॉस्पिटलचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी आमदार अक्षय कर्डिले, महापौर जोतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक अजिंक्य बोरकर, नगरसेवक महेश लोंढे व धोंडीराम राठोड, सौ. लीलावती राठोड यांच्यासह हॉस्पिटलचे तज्ज्ञ संचालक डॉ. केतन राठोड, डॉ. चेतन राठोड, डॉ. दर्शना माने-राठोड व डॉ. स्वाती राठोड प्रामुख्याने उपस्थित होते. बाहेरच्या राज्यांमध्ये वैद्यकीय क्षेत्रात दीर्घकाळ यशस्वी काम केल्यानंतर, आपल्या नगर शहरातच जागतिक दर्जाची आरोग्य सेवा मिळावी या ध्येयाने राठोड परिवाराने हे ’आरोग्य मंदिर’ उभारले आहे.



सावेडीत अद्ययावत हॉस्पिटलचे फित कापून उद्घाटन करताना आ. संगाम जगताप. समवेत आमदार अक्षय कर्डिले, नगरसेवक अजिंक्य बोरकर, नगरसेवक महेश लोंढे, धोंडीराम राठोड, सौ. लीलावती राठोड तज्ज्ञ संचालक डॉ. केतन राठोड, डॉ. चेतन राठोड, डॉ. दर्शना माने-राठोड व डॉ. स्वाती राठोड आदी.

आमदार संग्राम जगताप उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, अहिल्यानगरचा झपाट्याने विस्तार होत असून सावेडी सारख्या प्रमुख उपनगरात अशा अत्याधुनिक आणि जागतिक दर्जाच्या हॉस्पिटलची मोठी गरज होती. डॉ. राठोड यांनी बाहेरील राज्यात उच्च दर्जाचे वैद्यकीय अनुभव घेतल्यानंतर आपल्या शहरात परत येऊन ही सेवा सुरू केली, ही नगरकरांसाठी अभिमानास्पद बाब आहे. एकाच छताखाली लहान मुलांचे आजार आणि डोळ्यांचे अत्याधुनिक उपचार मिळाल्यामुळे नागरिकांची मोठी सोय होणार आहे. हे हॉस्पिटल नगरकरांच्या विश्वासाला नक्कीच पात्र ठरेल.

डॉ. दर्शना माने- राठोड म्हणाल्या, मुलांचे बालपण निरोगी आणि आनंददायी असणे ही प्रत्येक कुटुंबाची गरज असते. आमच्या चिल्ड्रन विंगमध्ये नवजात बालकांपासून ते किशोरवयीन मुलांपर्यंतच्या सर्व आजारांवर अत्याधुनिक उपचार उपलब्ध आहेत. केवळ आजार बरे करणे नव्हे, तर मुलांची शारीरिक व मानसिक वाढ योग्य पद्धतीने व्हावी, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. पालकांना आता बालकांच्या उपचारासाठी मोठ्या शहरात जाण्याची गरज भासणार नाही.

डॉ. केतन राठोड यावेळी बोलताना म्हणाले, आजच्या डिजिटल युगात लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत डोळ्यांच्या समस्या प्रचंड वाढल्या आहेत. आमच्या आय विंगमध्ये मोतिबिंदू, लहान मुलांचे तिरळेपणा, नंबरचे चष्मे आणि डोळ्यांच्या इतर गुंतागुंतीच्या आजारांवर जागतिक दर्जाच्या मशिन्स आणि तंत्रज्ञानाद्वारे उपचार केले जातील. ’स्पष्ट दृष्टी आणि उत्तम आरोग्य’ हेच आमचे ध्येय असून, अत्यंत माफक दरात आम्ही नगरकरांना ही कॉर्पोरेट दर्जाची सेवा देणार आहोत.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २६ जून रोजी बालरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २६ जून रोजी सकाळी १० ते २ यावेळेत बालरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे, पेडियाट्रीक सर्जन डॉ. रूपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ. वैभवी वंजारे शिबिरात तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालरोगावर अद्ययावत उपचार सुविधा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलमध्ये नवजात शिशुंसाठी २६ बेडचा अद्ययावत एन.आय.सी.यु. आहे. नवजात बाळाच्या श्वासोच्छ्वासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस.(श्वसन दाह), काविळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवांशिक व जन्मजात आजारांचे निदान, लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, २४ तास पॅथोलॉजी लॅब, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तपासणी मशीन, २४ तास तज्ज्ञ डॉक्टर, महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शस्त्रक्रिया सुविधा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत.

हॉस्पिटलमध्ये सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातात. सरकमसीजन (सुंता) ७५०० रूपये, हायड्रोसील १२,७०० रूपये, पेंडिक्स १४,५०० रूपये, जांघेचा हर्निया १४,००० रूपये, बेंबीचा हर्निया शस्त्रक्रिया १०,६५० रूपयात करण्यात येतात. औषध खर्च वेगळा असेल. सोनोग्राफी, रक्त, लघवी तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जातील.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये (संपर्क : मो. ९४०५२ ७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये (संपर्क : मो. ९४०४२९९९११), एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (संपर्क : मो. ९४०४२९७४११). २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२.). मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१- २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

# ‘बंदिश सांगीतिक कला प्रतिष्ठान संस्थे’तर्फे २८ जून रोजी ‘अष्टनायिका’ विशेष कार्यक्रम

नगर – ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गायिका अभिनेत्री पद्मश्री जयमालाबाई शिलेदार यांच्या जन्मशताब्दी निमित्त बंदिश सांगीतिक कला प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने अष्टनायिका हा विशेष कार्यक्रम माऊली सभागृह सावेडी येथे २८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात जयमालाबाई शिलेदार यांनी मराठी संगीत रंगभूमीवर गाजवलेल्या विविध संगीत नाटकांमधील भूमिका लोकप्रिय नाट्यपदांसह सादर होणार आहेत. सदर संकल्पना ज्येष्ठ गायिका अभिनेत्री आणि जयमालाबाईंच्या कन्या दीप्ती भोगले यांची आहे. या कार्यक्रमाची निर्मिती मराठी रंगभूमी, पुणे या संस्थेने केली आहे. या कार्यक्रमात भक्ती पागे (पुणे), अस्मिता चिंचाळकर (पुणे), सावनी दातार.. कुलकर्णी (पुणे) आणि डॉ.धनश्री खरवंडीकर (अहिल्यानगर) हे कलाकार या भूमिका साकारणार आहेत. कार्यक्रमास ज्येष्ठ गायिका अभिनेत्री वर्षा जोगळेकर (पुणे) या निवेदन करणार आहेत. तबला साथ शेखर दरवडे आणि ऑर्गन साथ मकरंद खरवंडीकर देणार आहेत. नेपथ्य मराठी रंगभूमी, पुणे, नेपथ्य सहाय्य संतोष गायकवाड आणि सहकारी, रंगभूषा सयाजी शेंडकर, केशभूषा सविता भैरी, प्रकाश योजना प्रतीक अंदुरे, ध्वनी व्यवस्था रवी जाधव करणार आहेत.

कार्यक्रमाचे प्रयोग पुणे आणि मुंबई येथे झाले असून हा कार्यक्रम म्हणजे अहिल्यानगरकर संगीत नाट्य रसिकांसाठी एक पर्वणी आहे. कार्यक्रम विनामूल्य असून रसिक, गुरुजन आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, कार्यक्रम वेळेवर सुरू होईल, प्रथम येणाऱ्यास प्राधान्य राहील असे निवेदन अविनाश देऊळगावकर, सुमेधा देशपांडे आणि अविनाश बोपर्डीकर यांनी संस्थेच्या वतीने केले आहे.

# रोटरी सेंट्रलच्या पुढाकारातून ११ महिलांना आटा चक्की वितरण

**स्वावलंबनाचा मार्ग खुला; पाच तालुक्यांतील गरजू कुटुंबांना मदतीचा हात**

नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल आणि चंद्रकांत, ज्योत्स्ना, आशिष व सौ. श्रद्धा मुथा परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकी जपत पाच तालुक्यांतील विविध गावांमधील सर्वसामान्य परिस्थितीतील, कुटुंबाला आधार देणाऱ्या महिलांना ११ आटा चक्क्यांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे लाभार्थी महिलांना स्वावलंबनाचा नवा मार्ग उपलब्ध झाला असून त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाची मदत मिळणार आहे.

या कार्यक्रमाला रोटरी जिल्हा ३१३२ चे प्रांतपाल रो. सुधीर लातुरे, सौ. संगीता लातुरे, क्लब अध्यक्ष सुनील कटारिया, सचिव अमर गुरप, माजी प्रांतपाल शिरीष रायते, नरेंद्र चोरडिया, मधुबाला चोरडिया, राजेश परदेशी, ईश्वर बोरा, मनीष बोरा, गिरीश मुळे, मीनल बोरा, सुजाता कटारिया, वैशाली रायते, विजूभाऊ जुंद्रे, राजीवभाई गुजर, उमेश रेखे, सुनील मुथा, संजय मुनोत, सतीश कटारिया, सार्थक कटारिया उपस्थित होते.



सर्वसामान्य परिस्थितीतील, कुटुंबाला आधार देणाऱ्या महिलांना ११ आटा चक्क्यांचे वितरण करण्यात आले.

प्रास्ताविकात अध्यक्ष सुनील कटारिया यांनी रोटरी सेंट्रलने चालू वर्षात राबविलेल्या विविध सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक प्रकल्पांची माहिती दिली. समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी तसेच गरजू कुटुंबांना सक्षम करण्यासाठी क्लब सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. रोटरी सेंट्रलने वर्षभरात अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रांतपाल रो. सुधीर लातुरे म्हणाले की, समाजातील दानशूर व्यक्ती व संस्था देणगीच्या माध्यमातून मदतीचा हात पुढे करतात. त्या देणग्यांचा योग्य व पारदर्शक विनियोग करून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे महत्त्वाचे कार्य रोटरीसारख्या संस्था करतात. गेल्या अनेक वर्षांपासून रोटरी विविध क्षेत्रांत निस्वार्थ भावनेने सेवा देत असून गरजूंपर्यंत मदतीचा लाभ पोहोचवित आहे.

ते पुढे म्हणाले की, समाजात आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि सर्वसामान्य अशा दोन्ही स्तरांतील लोक राहतात. या दोघांमधील दरी कमी करण्यासाठी सामाजिक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या पूर्वीच्या मूलभूत गरजांमध्ये आता काळानुरूप अनेक नव्या गरजांची भर पडली आहे. प्रत्येक गरज पूर्ण करणे शासनाला एकट्याला शक्य नसते. अशा वेळी रोटरीसारख्या सामाजिक संस्था समाजातील दानशूर व्यक्ती आणि गरजू घटक यांच्यामधील विश्वासाचा दुवा बनून कार्य करतात.

लाभार्थी महिलांना आटा चक्कीचे वितरण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळणार असून त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत रोटरी सेंट्रलच्या सामाजिक कार्याला शुभेच्छा दिल्या.

रोटरी सेंट्रल अहिल्यानगरने शहरासह ग्रामीण भागात विविध उपक्रम राबवून समाजात सकारात्मक कार्याची छाप निर्माण केली आहे. रोटरीची प्रतिमा उंचावण्यासाठी अध्यक्ष सुनील कटारिया यांनी वर्षभर सातत्याने प्रयत्न केले असून त्यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण टीम समाजोपयोगी कार्यात सक्रियपणे सहभागी होत आहे. सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि गरजूंच्या उन्नतीसाठी राबविण्यात आलेला हा आटा चक्की वितरणाचा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकास पात्र ठरला.





माहेश्वरी युवक मंडळाच्यावतीने महेश नवमीनिमित्त अहिल्यानगर शहरातून शोभा यात्रा काढण्यात आली होती. समाजातील स्त्री-पुरुष सहभागी झाले होते.

# माहेश्वरी युवक मंडळाच्यावतीने महेश नवमीनिमित्त शोभायात्रा

नगर – माहेश्वरी युवक मंडळच्यावतीने महेश नवमीनिमित्त नगर शहरातून शोभा यात्रा काढण्यात आली होती. या शोभायात्रेत महेश मंगल कार्यालय येथून प्रारंभ करण्यात आला. ही शोभायात्रा रामचंद्र खुंट, तपकिर गल्ली, सराफ बाजार, भिंगारवाला चौक, कापड बाजार, तेलीखुंट, आडते बाजार मार्गे पुन्हा महेश मंगल कार्यालय येथे आल्यानंतर त्या ठिकाणी भगवान शंकरची आरती करण्यात आली. घोडागाडी, बॅण्ड पथकाने सर्वांचे लक्ष वेधले. या शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.

माहेश्वरी समाजाचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे 'महेश नवमी' होय. या उत्सवानिमित्त समाजातील सर्व घटकांना एकत्रित करुन समाजोन्नत्तीचे उपक्रम राबविले जात आहे. सण-उत्सवातून आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाज संगठन करुन समाजातील प्रत्येक घटकांच्या अडचणी, प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. आज महेश नवमीनिमित्त शहरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली, यात समाज बांधव सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे विविध स्पर्धांच्या माध्यमातून प्रत्येकाच्या कला-गुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला आहे. वर्षभर विविध उपक्रमातून समाजातील प्रत्येक घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येते. महेश नवमीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बुद्धीबळ स्पर्धा, बॅडमिंटन स्पर्धा, गायन-वादन, प्रश्नमंजुषा आदि स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाचे प्रोजेक्ट चेअरमन प्रतीक सारडा, यश खटोड, अध्यक्ष अमित खटोड, पवन बंग, पियुष झंवर, शाम भुतडा, विशाल झंवर, सुमित चांडक, गोविंदा जाखोटिया, संकेत मानधने, सी ए अनिकेत बलदवा, गोविंद दरक, वसुमती बिहाणी, सिद्धार्थ झंवर, संकेत अट्टल, मधुर बिहाणी, गोविंदा काकांनी, भूषण काबरा, अभिनंदन कलानी, वेदांत बजाज, सी ए मनिष नावंदर, ऋषी बजाज, शिव तांडव स्तोत्र सावेडी महिला मंडळाने सादर केले तर शोभा यात्रेत भजन व आरती श्री लक्ष्मी नारायण सत्संग मंडळाने सादर केले

महेश भगवान ची वेशभूषा राहुल पल्लोड यांनी केली होती.

माहेश्वरी युवक संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व सर्व माहेश्वरी समाज बंधू-भगिनी यांनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केले.

# आई - वडील यांचे पूजन करून मदर - फादर डे साजरा करावा

### रवींद्र महाराज आव्हाड यांचे आवाहन




तपोवन रोडवरील हभप रविंद्र महाराज आव्हाड यांनी फादर डे ला हभप महादेव महाराज वडूलेकर, सौ.शकुंतलाबाई महादेव आव्हाड या मातृ - पितृचे पूजन करून सर्वांसमोर आदर्श ठेवला. (छाया - विजय मते)

नगर – आई – वडील हेच खऱ्या अर्थाने जीवनाचे पहिले गुरू आहेत. प्रत्येकांसाठी ते देवस्वरूप आणि आधारस्तंभ आहेत, त्यांच्या चरणी नतमस्तक होणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा सन्मान होय. केवळ मदर, फादर डे च्या दिवशी स्टेटस ठेवून आदर व्यक्त न करता आई-वडिलांचे पूजन करून डे साजरा करावा, असे आवाहन हभप रविंद्र महाराज आव्हाड यांनी केले.

तपोवन रोडवरील रिद्धी – सिद्धी निवास मध्ये मातृ-पितृ पूजन सोहळा करून फादर डे साजरा करण्यात आला. यावेळी हभप महादेव महाराज वडुलेकर व सौ. शकुंतलाबाई महादेव आव्हाड यांचे चरण पूजन करण्यात आले. हभप कानिफनाथ महाराज पंडित यावेळी उपस्थित होते. बरेच दिवसांपासून वडील आजारी होते, फादर डे च्या दिवशीच आजारावर मात करून घरी परतले असता त्यांचा कुटुंबासाठी असलेला त्याग, त्यांचे प्रेम आणि संस्कार यांचा गौरव म्हणून फादर डे ला त्यांचे चरण पूजन करण्यात आले. असे रविंद्र आव्हाड यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले माता पिता चरणी देवाचे दर्शन घडे, त्यांच्या आशीर्वादे जीवन मंगल वाढे,सेवा करिता त्यांची पुण्य सदा लाभे या अभंगाप्रमाणे हा सोहळा झाल्याने मनाला खूप मोठे समाधान मिळाले.

आपल्या वडिलांविषयी प्रेम, आदर व्यक्त करताना रवींद्र महाराज म्हणाले सात पिढ्यांपासून पांडुरंगाची वारी, २४ वर्षे दत्तात्रयांचे अनुष्ठान, प्रत्यक्ष भेट तसेच ज्ञानेश्वरी, गाथा, गीता, भागवत, रामायण, तुकाराम गाथा यांचा अभ्यास करून हजारो तरुणांना व्यसनमुक्त करीत, ज्ञानदानाचे कार्य त्यांनी केले. अशा माझ्या पितृदेवांचा शंकराचार्य भारती तीर्थ महास्वामी यांच्या हस्ते गौरव झाला होता. त्यांचा फादर डे ला पूजन करण्याचा मला मान मिळाला हे माझे भाग्य आहे. आई-वडिलांचे केवळ डे च्या दिवशी प्रेम व्यक्त न करता त्यांचा उतारवयात सांभाळ करा, त्यांची सेवा करा यामध्येच तुम्हाला भगवंत दिसेल, असे आवाहन त्यांनी केले.



## यासीन तांबोळी २० व्या वर्षी भारतीय सैन्यात भरती

शहरातील यासीन तांबोळी या युवकाने अवघ्या २० व्या वर्षी भारतीय सैन्यात भरती होण्याचा मान मिळवला आहे. देशसेवेचे स्वप्न साकार करत सैन्यात निवड झाल्यानंतर शहरात त्याचे उत्साहात स्वागत करण्यात आले. कुटुंबीय, नातेवाईक यांनी फुलांची उधळण करत वाजत-गाजत त्याचे अभिनंदन केले.

# श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांना सर्व सुविधा द्या

### ६० ते ७० हजार वारकऱ्यांच्या मुक्कामासाठी रस्ते, स्वच्छता, आरोग्य, पाणी व मंडप व्यवस्था करा : माजी सभापती अविनाश घुले यांची आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असलेल्या विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेने वारकऱ्यांसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी माजी सभापती तथा अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांना सर्व सुविधा देण्याच्या मागणीचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना देताना माजी सभापती अविनाश घुले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ११ जुलै रोजी विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा सालाबादप्रमाणे सुमारे ६० ते ७० हजार वारकरी व भाविकांसह हमाल पंचायत, हमाल भवन आणि मार्केट यार्ड परिसरात दोन दिवस मुक्कामासाठी थांबणार आहे. तसेच १२ जुलै रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत श्री निवृत्तीनाथ महाराजांचा ७२९ वा समाधी सोहळा भक्तिभावाने होणार आहे.

अहिल्यानगर शहरातच हा समाधी सोहळा हजारो वारकरी व भाविकांच्या उपस्थितीत पार पडत असल्याने मार्केट यार्ड परिसरातील सर्व रस्त्यांचे तातडीने डांबरीकरण व दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सोहळा ज्या रस्त्यावर होणार आहे त्या ठिकाणी वॉटरप्रूफ मंडप उभारावेत, तसेच भाविकांच्या सोयीसाठी बसण्याकरिता कार्पेट व चटईची व्यवस्था करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय महानगरपालिकेमार्फत मार्केट यार्ड व लगतच्या परिसराची विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत, महिलांसाठी स्वतंत्र स्नानगृहाची व्यवस्था करावी, घंटागाड्या, प्रकाशयोजना, शुद्ध पिण्याचे पाणी, औषधोपचार पथके, आरोग्य सुविधा आणि इतर आवश्यक सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

पालखी सोहळ्याच्या ठिकाणी कुलर, फॅन, २६५ केव्ही जनरेटर व्हॅन, साउंड सिस्टिम, स्वागत कमानी, आकर्षक लाईट व्यवस्था आणि पालखी सजावट महानगरपालिकेमार्फत करण्यात यावी. तसेच पालखी आगमनापासून ते प्रस्थान होईपर्यंत एकाही वारकरी किंवा भाविकाची गैरसोय होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, असेही घुले यांनी निवेदनात म्हटले आहे.

सोहळा संपल्यानंतर हमाल भवन व संपूर्ण मार्केट यार्ड परिसरात जंतुनाशक औषध फवारणी, डास प्रतिबंधक धूर फवारणी आणि विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

याबाबत बोलताना अविनाश घुले म्हणाले की, विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून महाराष्ट्राच्या संत परंपरेचा आणि वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा महान सोहळा आहे. हजारो वारकरी आणि भाविक अहिल्यानगरमध्ये मुक्कामासाठी येत असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये. महानगरपालिका, जिल्हा प्रशासन आणि सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिल्यास नगर शहराची सेवा आणि संस्कृती अधिक प्रभावीपणे राज्यासमोर उभी राहील. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

# अधिक मासनिमित्त अहिल्यानगरच्या श्री रेणुका ट्रॅव्हल्स आयोजित 'शिवमहापुराण कथेची' उत्तर प्रदेश येथील 'नैमिषारण्य' येथे सांगता

नगर – येथील श्री रेणुका ट्रॅव्हल्सने अधिक मासानिमित्त आयोजित नैमिषारण्य येथील शिवमहापुराण कथा कार्यक्रम उत्साहात झाला. अधिक मासानिमित्त झालेल्या या कार्यक्रमाचे भाविकांकडून कौतुक करण्यात आले. एक चांगला उपक्रम 'रेणुका'ने घडवून आणल्याबद्दल समाधान व्यक्त केले.



श्री रेणुका ट्रॅव्हल्सतर्फे अधिक मासानिमित्त आयोजित केलेला नैमिषारण्य येथील शिवमहापुराण कथा कार्यक्रम उत्साहात नुकताच झाला. छत्रपती संभाजीनगर येथील हरिभक्त परायण जयंतमहाराज नांदेडकर यांनी सुश्राव्य वाणीतून ही कथा सादर केली. कथा स्वरूपानुसार बलराम धर्मशाळेमध्ये शंकर-पार्वती विवाह व तत्सम प्रसंगांचे जिवंत देखावे सादर करण्यात आले.

नगरमधील श्री रेणुका ट्रॅव्हल्स कंपनीने उत्तर प्रदेशातील सीतापूर जिल्ह्यातील पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या नैमिषारण्य येथे छत्रपती संभाजीनगर येथील हरिभक्त परायण जयंतमहाराज नांदेडकर यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवमहापुराण कथा पर्यटकांना ऐकण्याची संधी दिली. 'अधिकस्य अधिक फलं' उक्तीनुसार या अधिक मासाच्या यात्रेत भाविकांना अनुभव आला.

नैमिषारण्य यात्रेमध्ये सुमारे १५० जण सहभागी होते. यात्रा ७ दिवसांची होती. येताना व जाताना रेल्वेने आरामदायी प्रवास तसेच स्थानिक १५ जणांच्या स्वयंपाकी ग्रुपसह ही सहल असल्याने पर्यटक खुश होते. सकाळी ९ ते १ पर्यंत कथा कालावधी होता. त्यानंतर शुद्ध शाकाहारी भोजन व्यवस्था सर्वांसाठी होती.

सात दिवस चाललेल्या या कथा श्रवणाबरोबरच भाविकांनी परिसरातील ललितादेवी, सिद्धपीठ मंदिर, व्यास गादी, गोमती नदी स्नान, मनुसतरुपा समाधी, पांडव किल्ला, हनुमान गढी, श्री बालाजी मंदिर, कालीपीठ मंदिर, देवदेवेश्वर रुद्रावर्त, दधिची मंदिर, हत्याहरण तीर्थ तसेच अयोध्या येथील राम मंदिर आदि ठिकाणांच्या दर्शनाचा लाभ घेतला. कथेच्या सांगता दिनी सत्यनारायण महापूजाही करण्यात आली.

जयंतमहाराज नांदेडकर यांची कथा सुरू होण्याआधी भाविक रोज येथील चक्रतीर्थावर स्नान करण्यासाठी जात. जेथे कथा सांगितली जात होती, त्या बलराम धर्मशाळेपासून हे ठिकाण सुमारे एक किलोमीटर होते. कथा स्वरूपानुसार बलराम धर्मशाळेमध्ये शंकर-पार्वती विवाह व तत्सम प्रसंगांचे जिवंत देखावे सादर करण्यात आले. यामुळे प्रत्यक्ष तो प्रसंग पाहत असल्याचे भाविकांना वाटत होते. कथेच्या सुरूवातीस सकाळी ८ वाजता शोभायात्रा व ग्रंथ दिंडी झाली. सर्व पर्यटक यामध्ये सहभागी होते. या संपूर्ण सहलीत भाविकांना कोणत्याही स्वरूपाची अडचण न आल्याने रेणुका ट्रॅव्हल्सला त्यांनी धन्यवाद दिले.

# धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस कारावास व दंड

नगर – अहमदनगर येथील ८ वे अतिरीक्त चिफ ज्युडिशिल मॅजिस्ट्रेट यांनी अशोक दत्तात्रय ससे रा. वांबोरी ता. राहुरी जि. अहिल्यानगर यांस निगोशिएबल इन्स्ट्रमेट ॲक्ट कलम १३८ अंतर्गत सहा महिने साधा कारावास व तसेच त्यांना रु.४,२०,००० आरोपीस दंड केला आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे दंडाची रक्कम न भरल्यास तीन महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे.

अर्थ समृध्दी कुरीज प्रा.लि. राहुरी ता. राहुरी जि. अहिल्यानगर चिट फंड कंपनी मधुन येथुन अशोक दत्तात्रय ससे यांनी रक्कम रु.५,००,००० ची भिशी २० नोव्हेंबर २०२२ रोजी घेतलेली होती व तसेच भिशीचा हप्ता नियमितपणे भरणा करणार असा विश्वास दिला होता परंतू त्यांनी भिशीच्या हप्त्याची रक्कम थकवली होती. सदर थकीत रक्कमेपोटी आरोपी यांनी रक्कम रुपये रु. २,१०,००० चा चेक १५ एप्रिल २०२५ रोजीचा फिर्यादी अर्थ समृध्दी कुरीज प्रा.लि. राहुरी ता. राहुरी जि. अहिल्यानगर यांना दिला होता. त्यानंतर फिर्यादी कंपनीने सदरचा चेक हा त्यांचे खाते असलेल्या आय डी बी आय शाखा दिल्लीगेट अहमदनगर येथे चेक हा वटण्यासाठी भरला असता खात्यात पुरेशी शिल्लक रक्कम नसल्याने चेक न वटता परत आला होता. त्यामुळे फिर्यादी कंपनीने अशोक दत्तात्रय ससे रा. वांबोरी ता. राहुरी जि. अहिल्यानगर यांचे विरुद्ध निगोशिएबल इन्स्ट्रमेट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. सदर केसमध्ये फिर्यादी कंपनीचा पुरावा ग्राहय धरून आरोपीस शिक्षा ठोठवली आहे. सदर केसमध्ये फिर्यादी कंपनीचे वतीने दिलीप परसराम घुमे (डायरेक्टर) व माहितगार इसम म्हणुन गणेश हिरालाल दायमा यांनी काम पाहिले.

फिर्यादी कंपनीतर्फे ॲड. प्रवीण मुटकुळे यांनी सक्षमपणे बाजु मांडली.

## जागतिक योग दिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेस ३० जूनपर्यंत मुदतवाढ

नगर – जागतिक योग दिनानिमित्त येथील योग विद्याधाम, कोहिनूर मॉल व श्रीपाद टॉईज यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेसाठी निबंध २० जून पर्यंत जमा करावयाचे होते. ती मुदतवाढ आता ३० जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे अशी माहिती योग्य विद्या धामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी दिली.

ही स्पर्धा खुला गट व शालेय गट अशा दोन गटांमध्ये घेतली जात आहे. खुल्या गटासाठी आत्म्याशी मैत्री करण्याचा मार्ग अष्टांग योग, आधुनिक जीवनशैली आणि योग साधना, योग केवळ शारीरिक व्यायाम की जीवन पद्धती व योग- संस्कृतीकडून समृद्धीकडे आणि विज्ञानातून अध्यात्माकडे या विषयावर घेण्यात येत आहे. तर शालेय गटासाठी निरोगी जीवनाची गुरुकिल्ली – योग, योगाभ्यासाचे आरोग्यासाठी महत्त्व व शालेय जीवनात योगाचे महत्त्व या विषयावर ही स्पर्धा आहे

या स्पर्धेसाठी शब्द मर्यादा ४०० ते १००० शब्द ठेवलेली आहे. या स्पर्धेमध्ये मराठी हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये तुम्हाला निबंध लिहिता येतात. विजयी स्पर्धकांना प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. तसेच नाव नोंदणी करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकांना ही बक्षीसे दिले जाणार आहेत.

स्पर्धकांनी आपले निबंध आता ३० जून पर्यंत योग विद्या धाम कुष्ठधाम रोड, ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूलच्या मागे, सावेडी येथे जमा करावयाचे आहेत. या स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ८२३७८२९१३७ किंवा ९३ २६ ९४ ० १ ३६ या नंबरवर संपर्क साधावा तसेच या स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन योग विद्या धामचा पूजा गांधी यांनी केले आहे.



अहिल्यानगर सीए शाखेतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# अहिल्यानगर सीए शाखेतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

नगर – अहिल्यानगर सीए शाखा, पतंजली योग समिती आणि नक्षत्र प्राणायाम ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने बुरूडगाव रोड येथील नक्षत्र लॉन्स येथे बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात चार्टर्ड अकाउंटंट्स, विद्यार्थी, तसेच नागरिकांनी सहभाग नोंदविला. योगाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

सकाळी ६ ते ८ या वेळेत आयोजित योग शिबिरात पतंजली योग समितीचे योगशिक्षक अविनाश ठोकळ यांनी मार्गदर्शन केले. गेल्या १० ते १२ वर्षांपासून सातत्याने योग प्रसारासाठी योगदान देत असलेल्या अविनाश ठोकळ यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना योगाचे शास्त्रशुद्ध ज्ञान दिले. योगाचा इतिहास, त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन तसेच आधुनिक जीवनशैलीत योगाचे महत्त्व आणि उपयुक्तता याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीराची लवचिकता वाढते, रोगप्रतिकारक शक्ती बळकट होते, तणाव व चिंता कमी होतात आणि मन अधिक शांत व एकाग्र राहण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. आचार्य राहुल ठोकळ व सौ. अनुराधा ठोकळ यांनी कपल योगासनांचे प्रात्यक्षिक सादर केले.

यावेळी भारतीय सनदी लेखापाल संस्था (ICAI) चे अध्यक्ष सीए प्रसन्न कुमार आणि उपाध्यक्ष सीए मंगेश किनरे यांच्या योग दिनानिमित्तच्या संदेशाचे व्हिडिओद्वारे प्रक्षेपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अहिल्यानगर सीए शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आपल्या मनोगतात त्यांनी आजच्या धावपळीच्या व तणावपूर्ण जीवनशैलीमध्ये योगाचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्थैर्य, आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले. योग हा भारताने जगाला दिलेला अमूल्य वारसा असून निरोगी समाज निर्मितीसाठी प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख पाहुणे माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले, योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक नागरिकाने योगाचा अंगीकार करणे अत्यावश्यक आहे. योगाच्या माध्यमातून शरीर आणि मनाचे स्वास्थ्य जपणे शक्य होते.

शाखेचे उपाध्यक्ष सीए महेश तिवारी यांनी योगशिक्षक अविनाश ठोकळ व योग प्रशिक्षक आचार्य राहुल ठोकळ यांचे मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. योग दिनासारखे उपक्रम समाजात आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात, असे त्यांनी सांगितले.

शिबिरासाठी सीए महेश भळगट, सीए सुनंदा रच्चा, सीए काजल चंदे, माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा, सीए प्रसाद पुराणिक यांच्यासह अनेक सीए सभासद, विकासाचे विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.



## खमंग बटाटा पुलाव

झटपट रेसिपी

दोस्तांनो, तुम्ही टॉमेटो राईस, कोबी भात, पुलाव असे प्रकार खाल्ले असतील. आता बटाटा पुलाव करून बघा. हॉस्टेल असो किंवा घर, आपल्याकडे बटाटे असतातच. अडीअडचणीला उपयोगी पडणारा हा बटाटा घालून तुम्ही खमंग पुलाव बनवू शकता. पटकन होणारी ही रेसिपी जाणून घेऊ.

**सामग्री:** एक वाटी तांदूळ, दोन ते तीन बटाटे, पुदिन्याची पानं, कोथिंबिर, दोन हिरव्या मिरच्या, चमचाभर लिंबाचा रस, एक तुकडा दालचिनी, जीरं,मीठ, तेल

**कृती:** तांदूळ धुवून अर्धा तास पाण्यात भिजवून ठेवा. पाणी काढून टाकून एका भांड्यात भात शिजवून घ्या. भात शिजवताना थोडं मीठ आणि घाला. तेलामुळे भात मोकळा होईल. पाणी काढून भात एका ताटात पसरवून घ्या. गार होऊ द्या. आता पुदिन्याची पानं, थोडी कोथिंबिर आणि मिरच्या एकत्र वाटून घ्या. यात चमचाभर लिंबाचा रस आणि थोडं मीठ घाला. बटाटे उकडून सोलून घ्या. त्याचे छोटे चौकोनी तुकडे करा. आता कढईत थोडं तेल गरम करा. जीरं आणि दालचिनीचा तुकडा घाला. मिनिटभर परता. मग यात पुदिना-कोथिंबिरीची वाटलेली पेस्ट आणि बटाटे घालून नीट परतून घ्या. यात शिजवलेला भात घाला. हलवून घ्या. चवीनुसार मीठ घाला. दोन मिनिटं शिजू द्या. बटाटा पुलाव तयार आहे. दह्यासोबत हा पुलाव खाता येईल.




## सुयश सिंह यांच्या अभियांत्रिकी कौशल्याची मस्क यांना मोहिनी

अचिव्हर

जुलै २०१९. अमेरिकेतील कॅलिफोर्नियामधील स्पेसएक्सच्या मुख्यालयात जगभरातील अव्वल अभियंते आणि संशोधकांची गर्दी जमली होती. कारण होते एलन मस्क यांच्या महत्त्वाकांक्षी 'हायपरलूप पॉड स्पर्धे'चे अंतिम सत्र. जगभरातून आलेल्या हजारो संघांमध्ये भारतातील एक संघही विशेष आकर्षण ठरत होता. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मद्रासमधील विद्यार्थ्यांच्या या संघाने आपले स्वप्न एका छोट्याशा 'पॉड'मध्ये साकारत स्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंत मजल मारली होती. विशेष म्हणजे, अडीच हजारांहून अधिक अर्जदार संघांमधून अंतिम फेरीत पोहोचणारा हा आशियातील एकमेव संघ होता. या संघाचे नेतृत्व एका तरुण अभियंत्याकडे होते. अंतिम विजेतेपद जर्मनीच्या संघाने पटकावले असले, तरी भारतीय संघाच्या स्वायत्त तंत्रज्ञान विकास क्षमतेने आणि उच्च दर्जाच्या अभियांत्रिकी कौशल्याने एलन मस्क यांनाही प्रभावित केले. त्यांनी संघातील सदस्यांची भेट घेत त्यांच्या कामाचे कौतुक केले आणि त्यांच्या जिद्दीची प्रशंसा केली. त्या संघाचे नेतृत्व करणाऱ्या तरुणाचे नाव होते सुयश सिंह. आज अनेक वर्षांनंतर सुयश पुन्हा एकदा जागतिक चर्चेत आले आहेत. या वेळी कारण आहे त्यांच्या स्टार्टअप गॅलेक्सआय चा 'मिशन दृष्टी' उपक्रम. या उपक्रमांतर्गत जगातील पहिला 'ऑप्टोसार' उपग्रह यशस्वीरित्या अवकाशात प्रक्षेपित करण्यात आला आहे. हा अत्याधुनिक उपग्रह ढग, धूर आणि घनदाट अंधार यांच्याही पलीकडे स्पष्ट प्रतिमा घेण्यास सक्षम आहे.

सुयश सिंह मूळचे उत्तर प्रदेशातील असून त्यांचे शालेय शिक्षण मध्य प्रदेश आणि उत्तर भारतातील विविध शहरांमध्ये झाले. त्यांनी एका खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयातून यांत्रिक अभियांत्रिकीची पदवी घेतली आणि त्यानंतर आयआयटी मद्रासमधून एअरोस्पेस अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. करिअरची सुरुवात त्यांनी डेटा ॲनॅलिटिक्स क्षेत्रात केली. पुढे मशीन व्हिजन आणि डीप-टेक संशोधनात काम करताना त्यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानातील अनुभव मिळवला. २०२१ मध्ये सुयश यांनी आपल्या सहकाऱ्यांसह 'गॅलेक्सआय' या स्टार्टअपची स्थापना केली; मात्र त्यांची नवोन्मेषी वाटचाल त्याही आधी सुरू झाली होती. आयआयटीमध्ये शिक्षण घेत असताना त्यांनी २०१७ मध्ये 'आविष्कार हायपरलूप' हा संघ स्थापन केला. हा भारतातील विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली उभारलेला पहिला हायपरलूप प्रकल्प मानला जातो. नेतृत्वगुण आणि नवकल्पनांमुळे त्यांची निवड 'आंत्रप्रेन्योर इंडिया ३५ अंडर ३५' या प्रतिष्ठित यादीतही झाली. तसेच ते युवकांसाठी कार्य करणाऱ्या जागतिक स्वयंसेवी संस्थेशी, 'एआयईएसईसी' शी देखील जोडलेले होते. यशाचा मार्ग मात्र त्यांच्यासाठी सरळ नव्हता. पहिल्याच प्रयत्नात त्यांचा संघ हायपरलूप स्पर्धेत अपयशी ठरला होता; परंतु पराभव स्वीकारण्याऐवजी सुयश स्वतःच्या खर्चाने अमेरिकेत गेले आणि स्पर्धेची संपूर्ण प्रक्रिया जवळून अभ्यासली. त्यांनी संघाची रणनीती बदलली, तांत्रिक तयारी अधिक सक्षम केली आणि त्याच प्रयत्नांचे फलित म्हणजे २०१९ मध्ये अंतिम फेरीपर्यंत पोहोचण्याचे यश. सुयश यांना हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर अशा दोन्हींमध्ये विशेष रस आहे. त्यामुळे गुंतागुंतीचा डेटा सर्वसामान्यांसाठी समजण्यास सोपा होतो. उपग्रह प्रतिमा, रडार डेटा किंवा पृथ्वी निरीक्षणाशी संबंधित माहिती सामान्य वापरकर्त्यांपर्यंत सहज पोहोचावी, हा त्यांचा दृष्टिकोन आहे.



## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।


उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

## उत्तराखंडमधील बजेटफ्रेंडली पर्यटनस्थळे

भटकंती

उत्तराखंडच्या खोऱ्यांमधील हिरवीगार डोंगर आणि थंडगार वारे आपल्याला कडक उन्हापासून आराम देतात. त्यामुळे आपल्यापैकी अनेकजण सुट्ट्यांमध्ये तसेच उन्हाळ्यात केवळ आराम करण्यासाठी डोंगर भागांकडे फिरायला जाण्याचा प्लॅन करतात, तर काही जण या भागांमधील ॲडव्हेंचरचा आनंद घेतात. ॲडव्हेंचर ॲक्टिव्हिटीमध्ये ट्रेकिंग हा एक उत्तम पर्याय आहे. कारण या ॲक्टिव्हिटी उन्हाळ्याचे दिवस अविस्मरणीय बनवतील. बर्फाच्छादित पर्वत, हिरवीगार शेतं, चोहोबाजूंनी पसरलेली झाडं आणि काही डोंगराळ वाट; पण हीच तर ट्रेकिंगची खरी मजा आहे. पण यासोबतच फिरायला जाताना बजेटचा विचार करणे देखील



सर्वात महत्त्वाचे असते.

उत्तराखंडच्या नैसर्गिक सौंदर्यात ट्रेकिंग करण्याचा अनुभव तुम्ही कधीही विसरणार नाही. अनेकदा उत्तराखंडबाहेरील लोकांना या ठिकाणांबद्दल मर्यादित माहिती असते. ही ठिकाणे कोणती, हे पाहू.

दयारा बुग्याल ट्रेक

दयारा बुग्याल ट्रेक उत्तरकाशीमध्ये आहे. येथील हिरवीगार मैदाने आणि हिमालय पर्वतरांगांची दृश्ये खरोखरच नेत्रदीपक आहेत. त्यामुळे येथे ट्रेकिंग करणे हा एक अद्वितीय अनुभव ठरतो. दयारा बुग्याल ट्रेकिंगची सुरुवात रायथल येथून होते. एका ट्रेकरला अंदाजे पाच ते सहा हजार रुपये खर्च येऊ शकतो. उन्हाळ्यात ट्रेकिंगसाठी मे ते जून हा सर्वोत्तम काळ आहे.

## ॲप वर्ल्ड

### व्हॉट्सॲपने फाईल्स पाठवणे सोपे



व्हॉट्सॲपने एक छान अपडेट आणले आहे. आता चॅटिंग करत असताना फोटो, व्हिडीओ किंवा फाईल्स पाठवणे खूप सोपे आणि फास्ट झाले आहे. चॅट स्क्रीन सोडावी लागणार नाही. यामुळे संभाषणाचा ओघ कधीच तुटणार नाही. व्हॉट्सॲपने मीडिया शेअरींग पद्धतीत मोठा बदल केला आहे. आता + आयकॉन दाबल्यावर तुम्हाला नवीन लूक दिसेल. खाली रिसेंट फोटोज आणि व्हिडिओजचा ४ बाय ४ ग्रीड दाखवला जाईल. यामुळे तुम्हाला गॅलरी उघडण्यासाठी चॅट बंद करण्याची गरज नाही. चॅट बॅकग्राउंडमध्ये राहील आणि तुम्ही पटकन फोटोज निवडून पाठवू शकाल. हे नवीन फीचर सध्या आयओएस म्हणजे आयफोन युजर्ससाठी आणले गेले आहे. व्हॉट्सॲप व्हर्जन २६.१९.७५ मध्ये हे बदल दिसत आहेत. बीटा टेस्टर्स आणि काही सिलेमकटेड युजर्सना आधीच मिळू लागले आहे. जेव्हा तुम्ही चॅटमध्ये + बटन दाबाल, तेव्हा डॉक्युमेंट्स, लोकेशन, कॅमेरा यासारख्या ऑप्शनसोबत खाली नवीन मिडिया ग्रीड दिसेल. पूर्वी गॅलरी उघडल्यावर संपूर्ण चॅट दिसेनाशी होत असे. समोरच्या व्यक्तीचा मेसेज चुकण्याची शक्यता असे; पण आता हे नवीन अपडेटमुळे चॅट सुरू ठेवताना सहज फोटोज आणि व्हिडिओज शेअर करता यतील. विशेषतः जे लोक खूप चॅटिंग करतात किंवा फोटोज पाठवतात, त्यांच्यासाठी हे फीचर खूप उपयोगी ठरेल. वेळ वाचेल आणि अनुभव अधिक चांगला होईल. हे फीचर सध्या सर्व आयफोन युजर्ससाठी उपलब्ध नाही. कंपनी बीटा टेस्टिंग करत आहे. लवकरच स्टेबल अपडेटद्वारे हे सर्वांना मिळेल.

## टेक्नो टॉक

### स्क्रिप्ट थेट स्क्रीनवर




सध्या दिमाखात आणि मोठ्या प्रमाणात चालत असलेली इंडस्ट्री म्हणजे कंटेट इंडस्ट्री. रोज लाखो कंटेट क्रिएटर्स वेगवेगळ्या पद्धतीचा कंटेट बनवून 'सोशल मीडिया'वर पोस्ट करत असतात. यासाठी जास्तीत जास्त वेळेस स्क्रिप्ट तयार करून तशीचा तशी बोलावी लागते; पण बऱ्याचदा कॅमेऱ्यासमोर उभं राहिल्यावर डायलॉग विसरणं, वारंवार कट घेणं आणि छोट्याशा चुकीसाठी पुन्हा रील शूट करणं प्रत्येक कंटेंट क्रिएटरची ही मोठी डोकेदुखी असते; पण आता इंस्टाग्रामने यावर भन्नाट उपाय आणला आहे. नवीन टेलिप्रॉम्प्टर फीचरमुळे स्क्रिप्ट थेट स्क्रीनवर दिसणार असल्याने रील्स शूट करणं अजूनच सोपं आणि प्रोफेशनल होणार आहे. त्यामुळे आता कमी वेळात झटपट आणि बिना कटचे व्हिडीओ तयार करता येणार आहेत. हे फीचर खासकरून रील्स बनवणाऱ्या क्रिएटर्ससाठी खूप फायदेशीर ठरणार आहे. व्हिडीओ शूट करताना डायलॉग विसरणं, पुन्हा पुन्हा टेक घ्यावे लागणं किंवा छोट्या चुकीमुळे पूर्ण रील परत शूट करावी लागणं, हा अनुभव अनेकांना येतो; पण आता स्क्रीनवरच स्क्रिप्ट दिसणार असल्यामुळे बोलताना कॉन्फिडन्स वाढेल आणि कमी वेळात स्मूथ, प्रोफेशनल रील्स तयार करता येतील. **कसं वापरायचं टेलिप्रॉम्प्टर फीचर?** * सर्वात आधी फोनमध्ये इन्स्ट्राग्राम ॲप उघडा. * त्यानंतर '+' आयकॉनवर टॅप करा आणि 'रील्स' पर्याय निवडा. * आता कॅमेरा सेक्शनमध्ये जा. * स्क्रीनच्या डाव्या बाजूला ऑडिओ, इफेक्ट्स, ग्रीन स्क्रिन, टच अप असे पर्याय दिसतील. * त्याखाली नवीन टेलिप्रॉम्प्टर ऑप्शन दिसेल. * त्या पर्यायावर टॅप करून तुमची स्क्रिप्ट पेस्ट करा. * आता स्क्रीनवर दिसणारी स्क्रिप्ट वाचत तुम्ही सहज रील शूट करू शकता. इंस्टाग्राम सध्या हे फीचर हळूहळू सगळ्या यूजर्ससाठी सुरू करत आहे. त्यामुळे काही जणांच्या ॲपमध्ये अजून टेलिप्रॉम्प्टर दिसत नसेल. अशावेळी इंस्टाग्राम ॲप अपडेट केलं तर हे फीचर दिसू शकतं.

## पैसा चांगला, काम कठीण


रोजगारवाटा



परदेशात नोकरी म्हटलं, की अनेकांना चकचकीत शहरं, ऐषोआरामाचं जीवन आणि डॉलर्समध्ये मिळणारा पगार आठवतो. हे चित्र काही अंशी खरं असलं, तरी त्यामागे एक दुसरी, अनेकदा दुर्लक्षित राहिलेली बाजू आहे. ती म्हणजे 'थ्री डी जॉब्स' ची. हे नाव कदाचित नवीन वाटेल; पण ते एका अशा रोजगाराचं वर्णन करतं, जिथे पैसा चांगला मिळतो; पण काम मात्र अत्यंत कठीण आणि धोकादायक असतं. 'थ्री डी' म्हणजे डर्टी (अस्वच्छ), डेंजरस (धोकादायक) आणि डिफिकल्ट (कठीण) अशा स्वरूपाच्या नोकऱ्या. यामध्ये शारीरिक कष्टाचं प्रमाण खूप जास्त असतं, कामाचे तास अनिश्चित असतात आणि अनेक वेळा काम करताना जीवाला धोका निर्माण होतो. ही कामं मुख्यतः बांधकाम साईट्सवर, मोठ्या फॅक्टरीमध्ये, सांडपाण्याच्या गटारांमध्ये, खाणींमध्ये किंवा जहाजांवर केली जातात. ही कामं मुख्यतः भारत, बांगला देश, पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, फिलिपिन्ससारख्या विकसनशील देशांमधून आलेले मजूर करतात. ही मंडळी आपल्या देशात कमी पगाराच्या नोकऱ्यांमुळे हताश झालेली असतात आणि परदेशात थोडी जास्त कमाईची संधी मिळाली तरी त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत काम करण्यास तयार असतात. या नोकऱ्यांमध्ये मिळणारा पगार त्यांच्या मूळ देशाच्या तुलनेत निश्चितच जास्त असतो; परंतु तो पगार 'जास्त' वाटण्यामागे मोजावी लागणारी किंमत फार मोठी असते.

## आळस सोडा, हालचाल वाढवा

फिटनेस फंडा




दोस्तांनो, वजन कमी करण्यासाठी, तंदुरुस्तीसाठी जीमची महागडी मेंबरशीप घेण्याची गरज नाही. जीममध्ये घाम गाळण्यासोबतच इतर अनेक पद्धतींनी तुम्ही वजन कमी करू शकता. यासाठी पैसेही खर्च करावे लागणार नाहीत. शारीरिक कष्ट मात्र घ्यावे लागतील. वजन कमी करण्याच्या या पर्यायांकडे आपलं दुर्लक्ष होतं. दैनंदिन जीवनातले साधेसे बदल तुमच्या आयुष्यात अमूलाग्र बदल घडवू शकतात. पण यासाठी आळस सोडायला हवा. बाईकचा वापरही टाळायला हवा. व्यायामाव्यतिरिक्तच्या या पर्यायांना 'नीट' म्हणजेच 'नॉन एक्सरसाइज थरमॉजेनेसिस' असं म्हटलं जातं. 'नीट' म्हणजे नेमकं काय हे समजून घेऊ.

खाणं, व्यायाम आणि झोप या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी वापरली जाणारी शारीरिक ऊर्जा म्हणजे 'नीट' असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. दुकानापर्यंत चालत किंवा सायकलवरून जाणं, जिने चढणं, बागकाम, पाळीव प्राण्याला बाहेर फिरायला नेणं, घरची कामं अशा ॲक्टिव्हिटींचा यात समावेश होतो. बाईकऐवजी चालत जाणं, लिफ्टऐवजी जिने चढणं अशा छोट्या छोट्या बदलांमुळे दिवसभरातल्या खर्च होणाऱ्या कॅलरींचं प्रमाण वाढत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. वर नमूद केलेले छोटे छोटे बदल अगदी सहज करता येतात.

## व्यावसायिक शिक्षणात जेंडर गॅप

सामजिक



व्यावसायिक शिक्षणामुळे आज विविध क्षेत्रांमध्ये नेतृत्वाच्या संधी उपलब्ध होत आहेत; मात्र प्रगती होत असतानाही मॅनेजमेंट कोर्सेसमधील स्त्री-पुरुषांच्या संख्येतील तफावत हा चिंतेचा विषय ठरत आहे. उच्च शिक्षणासाठी महिलांच्या नोंदणीचे प्रमाण वाढले असले, तरी बिझनेस स्कूल्समध्ये, विशेषतः विशिष्ट विषयांमधील त्यांचे प्रतिनिधित्व अजूनही कमी आहे.

ही तफावत केवळ क्षमता किंवा महत्त्वाकांक्षेमुळे नाही, तर सामाजिक अपेक्षा, मार्गदर्शनाचा अभाव आणि संधींमधील असमानता यामुळे निर्माण झाली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी आता अनेक बिझनेस स्कूल्स आपल्या शिक्षण पद्धतीत आणि वातावरणात महत्त्वाचे बदल करत आहेत. मॅनेजमेंट प्रोग्राम्स आणि नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या संख्येतील असमानता म्हणजे 'जेंडर गॅप'. विशेषतः फायनान्स, ॲनालिटिक्स, ऑपरेशन्स आणि स्ट्रॅटेजी यांसारख्या विषयांमध्ये महिलांचे प्रमाण आजही कमी दिसते. तसेच, जागतिक संधी किंवा उद्योजकता क्षेत्राकडे वळणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या मर्यादित आहे. ही तफावत केवळ वर्गापुरती मर्यादित नसून, कॉर्पोरेट क्षेत्रातील वरिष्ठ पदांवरही याचे पडसाद उमटतात.

ही तफावत का टिकून आहे?

यामागे सामाजिक, शैक्षणिक आणि संस्थात्मक अशी अनेक कारणे आहेत:

* सामाजिक जडणघडण: तांत्रिक किंवा जास्त जोखीम असलेल्या क्षेत्रांकडे (उदा. फायनान्स) जाण्याऐवजी महिलांना ठराविक क्षेत्रांकडे वळवले जाते.

* आत्मविश्वासाचा अभाव: क्षमता असूनही स्पर्धात्मक प्रकल्प किंवा नेतृत्वाची भूमिका स्वीकारताना विद्यार्थिनींमध्ये काहीसा संकोच दिसून येतो.

* रोल मॉडेल्सची कमतरता: वर्गातील केस स्टडीज किंवा प्राध्यापकांमध्ये महिला नेत्यांचे प्रमाण कमी असल्याने विद्यार्थिनींना योग्य प्रेरणा मिळत नाही.

विविधता का महत्त्वाची आहे?

बिझनेस स्कूलमध्ये स्त्री-पुरुषांचे योग्य प्रमाण असणे केवळ न्यायाचे नसून ते फायदेशीरही आहे. नेतृत्व करणाऱ्यांमध्ये विविधता असणाऱ्या कंपन्यांमध्ये निर्णय अधिक अचूक असतात आणि त्यांची आर्थिक प्रगतीही चांगली होते. बिझनेस स्कूलमध्ये सर्वसमावेशक वातावरण असते, तेव्हा मुले आणि मुली दोघांनाही विविध दृष्टिकोनातून विचार करायला शिकता येते.

## साधा व्यक्तिमत्व विकास

स्किल डेव्हलपमेंट



स्वतःला एक उत्तम विद्यार्थी बनवायचे असेल, तर फक्त वर्गाच्या भिंतींपुरतेच शिक्षण मर्यादित ठेवू नका. आपण शिकत असलेली कौशल्ये बौद्धिक आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वाची असली, तरी विचारांचे जग उघडण्यासाठी बरेच काही करण्याची आवश्यकता आहे.

वर्तमानपत्रे, मासिके वाचण्याची सवय लावून घ्या. जेणेकरून देशात आणि जगात घडणाऱ्या घटनांबद्दल माहिती मिळेल. यामुळे सामान्य ज्ञान सुधारेल. याशिवाय, तुम्ही घरातील निर्णयांमध्ये स्वतःचे मत देऊ शकता, जेणेकरून तुमची निर्णय घेण्याची क्षमता वाढेल. तसेच, तुमच्या या आचरणामुळे आपण जबाबदारी घेतोय हे घरच्यांच्या लक्षात येईल. त्याच वेळी, घरातील इतरांच्या आवडींबद्दल उत्साह दाखवा. त्यातून तुम्ही घरच्यांचा विचार करता हे दिसून येईल. याशिवाय, इंटरनेटवर नवीन माहिती शिकण्याचे मार्ग शोधा. हे आपल्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक आहे आणि नवीन गोष्टी जाणून घेण्याची सवय तुम्हाला पुढील आयुष्यात उपयोगी पडेल. चारचौघांमध्ये गेल्यावर बुजून जाऊ नका. विविध माध्यमांतून शिकलेल्या गोष्टींमुळे येणारा आत्मविश्वास इतरांना जाणवू द्या. पुढील आयुष्यात सभाधीटपणा खूप उपयोगी पडतो. त्याची सुरूवात अशा प्रसंगांमधूनच होत असते, हे लक्षात ठेवा.

## स्किनी जीन्स योग्य ?

फॅशन पॅशन



फॅशनच्या जगात बदल हा कायमस्वरूपी नियम आहे. एकेकाळी तरुणाईच्या वॉर्डरोबवर राज्य करणाऱ्या स्किनी जीन्स आता नव्या पिढीकडून नाकारल्या जात असून त्यांची जागा सैलसर, रुंद आणि अधिक आरामदायी जीन्स घेत आहेत. 'सोशल मीडिया'वर, विशेषतः टिकटॉकवर, स्किनी विरुद्ध बॅगी जीन्स या वादाने पिढ्यांमधील फॅशनची दरी स्पष्ट केली आहे. जन. झीमधील तरुण पुरुष मोठ्या प्रमाणात स्किनी जीन्सचा त्याग करून स्ट्रेट-लेग, बॅगी आणि 'मॉम फिट' शैलीकडे वळताना दिसत आहेत. अनेकांचे मत आहे की बॅगी जीन्स अधिक आरामदायी, कमी बंधनकारक आणि दैनंदिन वापरासाठी अधिक सोयीस्कर आहेत. महिलांनी हा ट्रेंड आधीच स्वीकारला असला तरी पुरुषांमध्ये हा बदल तुलनेने हळूहळू होत आहे. फॅशन तज्ज्ञांच्या मते, पुरुषांच्या फॅशनमधील ट्रेंड बदलण्याचा वेग महिलांच्या तुलनेत कमी असतो. एकदा एखादी शैली आवडली की पुरुष ती अनेक वर्षे कायम ठेवण्याची प्रवृत्ती दाखवतात. मागील काही वर्षांमध्ये पुरुषांच्या कपड्यांमधील सिल्व्हेट्स अधिक रुंद आणि सैल होत गेले आहेत. लक्झरी ब्रँडपासून ते लोकप्रिय डेनिम ब्रँडपर्यंत अनेक कंपन्यांनी या ट्रेंडला प्रतिसाद दिला आहे. उदाहरणार्थ, स्केटबोर्ड संस्कृतीने प्रेरित असलेल्या सैलसर डेनिम शैली तरुणांमध्ये विशेष लोकप्रिय ठरत आहेत. स्केटिंग करताना अधिक हालचाल, लवचिकता आणि आराम मिळावा म्हणून रुंद जीन्सचा वापर केला जातो. हाच आरामदायीपणा आता मुख्य प्रवाहातील फॅशनमध्ये दिसून येत आहे.

या बदलामागे केवळ फॅशनचा प्रभाव नाही, तर जीवनशैलीतील बदलही कारणीभूत असल्याचे मानले जाते. कोविड-१९ महामारीदरम्यान लोकांनी घरात राहून अधिक आरामदायी कपड्यांची सवय लावून घेतली. लॉकडाऊनच्या काळात ट्रॅकपॅंट, जॉगर्स आणि ॲथलीजर कपड्यांचा वापर वाढला. त्यामुळे पुन्हा एकदा अत्यंत घट्ट स्किनी जीन्सकडे परत जाण्याऐवजी लोकांनी अधिक मोकळे आणि आरामदायी पर्याय स्वीकारले. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, अधूनमधून स्किनी जीन्स घालणे सामान्यतः धोकादायक नसते; परंतु खूपच घट्ट जीन्स दीर्घकाळ घातल्यास काही आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. अशा जीन्समुळे रक्ताभिसरणावर ताण येऊ शकतो, त्वचेवर घर्षण निर्माण होऊ शकते आणि काही व्यक्तींमध्ये मज्जातंतूंवर दबाव पडून पायांमध्ये मुंग्या येणे, सुन्नपणा किंवा वेदना जाणवू शकतात. काही महिलांमध्ये घट्ट कपड्यांमुळे त्वचेच्या संसर्गाचा किंवा अस्वस्थतेचा धोका वाढू शकतो. पोटावर सतत दाब येत असल्यास ॲसिडिटी किंवा पचनाशी संबंधित तक्रारी वाढण्याची शक्यता देखील काही संशोधनांमध्ये नमूद करण्यात आली आहे. तथापि, याचा अर्थ असा नाही की स्किनी जीन्स पूर्णपणे टाळाव्यात. योग्य आकाराची, शरीराला न दाबणारी आणि हालचालींना अडथळा न आणणारी स्किनी जीन्स वापरल्यास गंभीर समस्या उद्भवण्याची शक्यता कमी असते. आरोग्याच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे कपड्यांचा आराम आणि शरीराला मिळणारी मोकळीक. फॅशन विश्लेषकांच्या मते, सुमारे १५ ते २० वर्षांच्या कालावधीनंतर फॅशनचे ट्रेंड पुन्हा बदलतात. एकेकाळी अतिशय रुंद 'जेएनसीओ' जीन्स लोकप्रिय होत्या, त्यानंतर स्किनी जीन्सचा काळ आला आणि आता पुन्हा बॅगी शैली परतली आहे. काही अर्थतज्ज्ञ तर कपड्यांच्या या बदलत्या शैलींचा संबंध आर्थिक परिस्थितीशी जोडतात.

# ‘माहिती अधिकार कायद्याची हत्या थांबवावी’; सरकारविरोधात नगरमध्ये वकिलांचा एल्गार

नगर – महाराष्ट्र शासनाने नुकत्याच लागू केलेल्या महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६ मधील नागरिकविरोधी तरतुदींविरोधात आता वकिली क्षेत्रातून तीव्र संताप व्यक्त होत असून, या कायद्याच्या रक्षणासाठी वकिलांनी थेट सरकारविरोधात एल्गार पुकारला आहे.


माहिती अधिकार कायद्यातील बदलाविरोधात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना वकीलांचे शिष्टमंडळ.

माहिती अधिकार कायद्याच्या जनहितविरोधी नियमावलीविरुद्ध संपूर्ण वकील संघटनेने एकत्र येऊन आंदोलन करण्याची आणि थेट मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवण्याची ही राज्यातील पहिलीच मोठी घटना ठरली आहे. अहिल्यानगर बार असोसिएशनच्या तब्बल २८५ वकिलांनी स्वाक्षऱ्यांचे जाहीर निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज अशिया यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवून संबंधित वादग्रस्त नियम तातडीने मागे घेण्याची आग्रही मागणी केली आहे.

वकिलांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम हा सामान्य नागरिकांना प्रशासनाला आणि शासनाला जबाबदार धरण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. मात्र, राज्य सरकारने केलेल्या नव्या नियमांमुळे हा कायदा अत्यंत गुंतागुंतीचा, खर्चिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर जाण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः माहिती अधिकाराच्या अपील किंवा तक्रारीच्या सुनावणीवेळी अर्जदाराला वकिलांची मदत घेण्यास मनाई करणारी नियम २०(३) मधील तरतूद ही अत्यंत धक्कादायक असून, ती नागरिकांच्या न्यायप्रवेशाच्या मूलभूत अधिकारावर थेट आघात करणारी आहे. कायद्याचे क्लिष्ट व गुंतागुंतीचे प्रश्न सुनावणीदरम्यान उपस्थित होत असताना, नागरिकांना त्यांच्या पसंतीच्या वकिलांची मदत नाकारणे हे लोकशाही मूल्यांना पूर्णपणे हरताळ फासणारे असल्याचे वकिलांनी स्पष्ट केले आहे. याशिवाय नव्या नियमावलीत अर्जदाराकडून ओळखपत्र मागणे, माहिती मागण्यामागचे कारण विचारणे, पुनरावृत्ती अर्जांवर कडक निर्बंध घालणे आणि विविध शुल्कांमध्ये मोठी वाढ करणे यांसारख्या लोकशाहीविरोधी तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या असून, या तरतुदी माहितीच्या अधिकाराच्या मूळ उद्देशालाच संपवणाऱ्या आहेत. माहितीचा अधिकार हा शासनाची कृपा नसून तो नागरिकांचा कायदेशीर अधिकार आहे आणि या अधिकारावर निर्बंध आणण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, अशी ठाम भूमिका वकील संघटनेने घेतली आहे.

शासनाने या काळ्या नियमांना तातडीने स्थगिती द्यावी आणि राज्यातील वकील संघटना, माहिती अधिकार कार्यकर्ते, पत्रकार व नागरिक प्रतिनिधी यांच्याशी व्यापक चर्चा करूनच नव्याने पारदर्शक नियम तयार करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज अशिया यांना सुपूर्द करताना अहिल्यानगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे, ॲड. युवराज पाटील, ॲड. संजय सुंबे, ॲड. शिवाजीराव सांगळे, ॲड. प्रांजल मुनोत–गांधी, ॲड. संतोष भोसे, ॲड. सुरेश लगड, ॲड. सोमेश पालीवाल आणि ॲड. श्याम आसावा या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह वकील उपस्थित होते.

# ‘माहिती अधिकार कायद्याच्या मोडतोडीविरोधात’ नगरमध्ये आंदोलन; ‘मायबाप’ सरकारचा निषेध

नगर – समाजसेवक अण्णा हजारे यांच्या दोन तपाहून अधिक काळाच्या ऐतिहासिक संघर्षानंतर अस्तित्वात आलेल्या माहिती अधिकार कायद्याला सुरुंग लावण्याचा कुटील डाव सरकारने आखला आहे. या अन्यायकारक बदलांविरोधात वाडिया पार्क येथील महात्मा गांधी पुतळ्याजवळ तीव्र प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी आणि कायदेतज्ज्ञांनी शरण नाही तर मरण असे हुकूमशाही धोरण राबवणाऱ्या सरकारचा कडाडून निषेध केला. गेल्या वीस वर्षांत माहिती अधिकारामुळे भ्रष्ट प्रशासनाला चाप बसला असून अनेक मोठे घोटाळे चव्हाट्यावर आले आहेत. मात्र, आता सरकार काही जाचक आणि ’तुघलकी’ अटी घालून हा कायदाच मोडीत काढण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. नव्या बदलांनुसार माहिती मागणाऱ्याची ओळख पटवणे, माहिती मागण्याचे कारण स्पष्ट करणे आणि ही माहिती समाजासाठी कशी उपयोगी आहे हे अर्जदारानेच सिद्ध करणे अनिवार्य केले जात आहे. इतकेच नव्हे तर अपिलादरम्यान वकिलाची मदत घेण्यासही बंदी घालण्यात आली आहे. हा सर्व प्रकार म्हणजे माहिती अधिकाराची पूर्णपणे ’माती’ करण्याचा सरकारी कट असून तो जनता कदापि सहन करणार नाही, असा इशारा यावेळी ॲड. शाम असावा, अशोक सब्बन आणि ॲड. सुरेश लगड यांनी दिला.



‘माहिती अधिकार कायद्याच्या मोडतोडीविरोधात’ महात्मा गांधी पुतळ्याजवळ जागरूक नागरिक मंचच्यावतीने प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना जागरूक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी सरकारच्या कारभाराचा तीव्र शब्दांत पंचनामा केला. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर आज गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचाराचा कळस झाला असून, खालच्या कर्मचाऱ्यापासून ते मंत्रालयातील उच्चपदस्थांपर्यंत ही साखळी पोहोचल्याची टीका त्यांनी केली. विरोधक शिल्लक न राहिल्यामुळे आता सरकारला माहिती अधिकाराची अडचण वाटू लागली आहे, असेही ते म्हणाले. शाकीर शेख व ॲड. असावा यांनी कायदेशीर पुरावे सादर करत सरकारच्या या छुप्या अजेंड्यावर प्रकाश टाकला. या अन्यायकारक तरतुदी आणि बदल सरकारने त्वरित मागे न घेतल्यास हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल आणि सामान्य जनतेला सोबत घेऊन रस्त्यावर उतरू, असे आवाहन करण्यात आले.

आंदोलनात ॲड. प्रांजल मुनोत, भैरवनाथ वाकळे, जालिंदर बोरुडे, ॲड. संतोष भोसले, सोमेश पालीवाल, दीपक तलरेजा, निलेश मुदीगोंडा, वीर बहादूर प्रजापती, तुषार सोनवणे, सतीश कांबळे आदी सहभागी झाले होते.

# छावणी परिषदेमधील भिंगार पोस्ट ऑफिस स्थलांतराला महिला एजंटांकडून विरोध; तक्रार दाखल

नगर – भिंगार छावणी परिषदेमधील भिंगार पोस्ट ऑफिस जिल्हा न्यायालय परिसरात स्थलांतरित करण्याच्या निर्णयाला स्थानिक महिला प्रधान एजंटांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या संदर्भात वरिष्ठ पोस्ट मास्तर तसेच अधीक्षक, अहिल्यानगर यांना निवेदन देण्यात आले आहे. सदर पोस्ट ऑफिसचे प्रस्तावित ठिकाण हे सध्याच्या जागेपासून अंदाजे ३ ते ४ कि.मी. अंतरावर असल्याने तेथे ये–जा करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याचे अर्जदारांनी नमूद केले आहे. विशेषतः महिला एजंटांना रोख रक्कम सोबत नेणे धोकादायक व जबाबदारीचे ठरणार असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे वेळ आणि पैशाचा अपव्यय होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

भिंगार परिसरात वडारवाडी, बाराबाभळी, नागरदेवळे यांसारख्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात वसाहती विकसित झाल्या असून, येथील नागरिकांची बचत खाती, पी. एल. आय., सुकन्या समृद्धी योजना तसेच विविध गुंतवणूक खाती भिंगार पोस्ट ऑफिसशी निगडीत आहेत. याशिवाय नव्या वसाहतीतील नागरिक रजिस्टर पार्सल व इतर कामांसाठी नियमितपणे पोस्ट ऑफिसचा वापर करतात. वृद्ध महिला व पुरुषांनाही या सेवांचा मोठा आधार आहे. तसेच भिंगार परिसरात संरक्षण दलाची अनेक कार्यालये असून त्यांची रजिस्टर व इतर पोस्टल कामे मोठ्या प्रमाणात येथेच पार पडतात. विविध बँका व पतसंस्थांचीही नोंदणीसंबंधित कामे येथे होतात. संरक्षण दलातील सेवानिवृत्त तसेच कार्यरत कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांचेही या पोस्ट ऑफिसवर मोठे अवलंबित्व आहे.

या पार्श्वभूमीवर पोस्ट ऑफिसचे स्थलांतर न करता ते मुख्य रस्त्यावर किंवा मध्यवर्ती बाजारपेठेत हलविण्याची मागणी करण्यात आली आहे. असे केल्यास नागरिकांना सुविधा मिळण्याबरोबरच पोस्ट ऑफिसचा व्यवसायही वाढेल, असे मत अर्जदारांनी व्यक्त केले आहे. भिंगार परिसरात नव्या वसाहती निर्माण होत असताना विद्यमान पोस्ट ऑफिस हलविण्याऐवजी नवीन शाखा सुरू करणे अधिक योग्य ठरेल, असेही त्यांनी नमूद केले आहे. तसेच भिंगार वेस येथे एकच पोस्ट ऑफिस राहिल्यास कामाचा ताण वाढून तो एका व्यक्तीस पेलणे कठीण होईल, अशीही चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी या निवेदनाचा गांभीर्याने विचार करून भिंगार पोस्ट ऑफिसचे स्थलांतर रद्द करावे, अशी विनंती सुवर्णा किरण फुलारी, नयना देविदास कानडे, वनिता विजय कराळे आणि वैशाली महेश खडके यांनी केली आहे.


## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

Truhome FINANCE

(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

नोंदणीकृत कार्यालय : श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई–६०००१८; मुख्यालय : लेव्हल – ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी–२, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ वेबसाइट : http://www.truhomefinance.in

### प्रतिकात्मक ताबा सूचना

ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पुर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) चे अधिकृत अधिकारी म्हणून अधीस्वाक्षरीकृत यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिक्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (वर्तमान अधिनियम) च्या तरतुदींनुसार आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ (वर्तमान नियम) च्या नियम ३ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदारांना मागणी नोटिस जारी केल्या आहेत ज्यांचे तपशील खालील तक्त्यात नमूद केले आहेत.

कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला सूचना देण्यात येत आहे की अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी या कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम ८ सह वाचलेल्या उक्त नियमांनुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून येथे नमूद केलेल्या रकमेसाठी व्याजासह शुल्क आकारले जाईल.

कर्जदाराचे लक्ष ‘कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे आमंत्रित केले आहे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी.

### कर्जदाराचे नाव व पत्ता

१. श्री. मोहम्मद फरमान उस्मान (कर्जदार)
२. श्रीमती नाझनीन फरमान मोहम्मद (सह–कर्जदार)
सध्याचा पत्ता : घर क्र. ९१२, गोविंदपुरा, वाबळे कॉलनी, फकीरवाडा,टॉप–अप पेट्रोल पंपासमोर, अहमदनगर – ४१४००१, महाराष्ट्र, भारत.
मालमत्तेचा पत्ता: भिंगार, सर्व्हे क्र. ३४६/१सी, ब्लॉक क्र. ८६, फकीरवाडा रोड, भिंगार, अहमदनगर – ४१४००१.
एनपीए तारीख : ०५/०८/२०२३, कर्ज क्रमांक : SHLHAMDR0000069

### थकबाकी रक्कम

कर्ज खाते क्रमांक SHLHAMDR0000069 अन्वये, दिनांक ०९–०८–२०२३ रोजीची रक्कम रु. १३,४१,८९३/– (अक्षरी रुपये तेरा लाख एकेचाळीस हजार आठशे त्र्याण्णव मात्र). तसेच सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करारातील दराने पुढील व्याज.
मागणी नोटीस दिनांक: २४/०८/२०२३
भौतिक ताबा दिनांक: १९/०६/२०२६

### मालमत्तेचे वर्णन

भिंगार (अहमदनगर) येथील सर्व्हे क्र. ३४६/१ सी मधील, एकूण २४० चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या भूखंड क्र. ८६ वरील मसमीर को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीमधील रो–हाऊस क्र. ११५ (ज्याचे एकूण क्षेत्रफळ ४८.०० चौ.मी. आणि बांधकामाचे क्षेत्रफळ २५.८३ चौ.मी. आहे) ही मालमत्ता; जिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत – पूर्व: अंतर्गत रस्ता, पश्चिम : गल्ली, दक्षिण : भूखंड क्र. ५९, उत्तर: रो–ब्लॉक क्र. ११६.

### कर्जदाराचे नाव व पत्ता

१. श्री. अविनाश दिलीप बोरुडे (कर्जदार),
२. श्री. विशाल दिलीप बोरुडे (सह–कर्जदार)
३. श्रीमती विमल दिलीप बोरुडे (सह–कर्जदार)
४. श्रीमती साक्षी अविनाश कांबळे (सह–कर्जदार)
सध्याचा पत्ता: १–२–३, सर्व्हे क्र. ७२/७, प्लॉट क्र. १–२–३–३, बीआय क्र. ३, ओंकार रो–हाउसेस, अहमदनगर शहर, विशाल वालकर उद्यान जवळ, अहमदनगर – ४१४००१, महाराष्ट्र, भारत. १२३, रामवाडी ३६६, सर्जेपुरा, अहमदनगर शहर – ४१४००१.
अविनाश कांबळे यांची कन्या, महाराष्ट्र मेडिकल समोर, सिद्धार्थ कॉलनी, नवीन चाळ बी ६/२, चेंबूर, मुंबई (उपनगर), महाराष्ट्र – ४०००७१.
(मालमत्तेचा पत्ता): सर्व्हे क्र. ७२/२, रो–ब्लॉक क्र. ए, प्लॉट क्र. ३९ ते ४१/२, बोल्हेगाव, ता. अहमदनगर, जि. अहमदनगर – ४१४१११.
एनपीए तारीख :– ०५/०४/२०२६
कर्ज क्रमांक: SHLHAMDR00000551

### थकबाकी रक्कम

कर्ज खाते क्रमांक SHLHAMDRO0000551 अन्वये, दिनांक ०७–०४–२०२६ रोजीची देय रक्कम रु. १५,४४,९६३/– (अक्षरी रुपये पंधरा लाख चव्वेचाळीस हजार नऊशे त्रेसष्ठ फक्त); तसेच सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करारातील दराने होणारे पुढील व्याज. मागणी नोटीस दिनांक: १०/०४/२०२६, भौतिक ताबा दिनांक: १७/०६/२०२६

### मालमत्तेचे वर्णन

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बोल्हेगाव (ता. व जि. अहमदनगर) येथील सर्व तो भूखंड (प्लॉट), जो रो ब्लॉक क्र.मध्ये असून, पश्चिम बाजूने प्लॉट क्र. ३९ ते ४१/२ पर्यंत विस्तारलेला आहे; तसेच सर्व्हे क्र. ७२/२ मधील १९०.८२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या या प्लॉटवर असलेले २८.७१ चौ.मी. क्षेत्राचे संपूर्ण बांधकाम. पूर्व – प्लॉट क्र. ३९/४०/४१/२ (रो ब्लॉक क्र. बी), दक्षिण – ३३ आणि ३४, पश्चिम – प्लॉट क्र. ३९ ते ४१/३ (रो ब्लॉक क्र. बी), उत्तर – ६ मीटर रुंदीचा रस्ता (प्लॉट क्र.)

### कर्जदाराचे नाव व पत्ता

१. श्री. राजेंद्र दत्तात्रय गिरमे (कर्जदार)
२. श्रीमती भारती राजेंद्र गिरमे (सह–कर्जदार)
सध्याचा पत्ता: हनुमान वाडी, एकलहरे ना एकलहरे टिळकनगर जवळ औद्योगिक अंबी श्रीरामपूर. महाराष्ट्र भारत ४१३७१५
मालमत्ता पत्ता : हनुमान वाडी, एकलहरे, टिळक नगर जवळ इंडस्ट्रियल अंबी, श्रीरामपूर ए नगर – एकलहरे श्रीरामपूर ४१३७१५
एनपीए तारीख:–०५/०४/२०२६, कर्ज क्रमांक SILHAMDR0000659

### थकबाकी रक्कम

कर्ज खाते क्रमांक SILHAMDR0000659 अन्वये, दिनांक ०७–०४–२०२६ रोजीची देय रक्कम रु. ५,७१,३६८/– (अक्षरी रुपये पाच लाख एकाहत्तर हजार तीनशे अडुसष्ठ फक्त); तसेच सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करारातील दराने पुढील व्याज.
मागणी नोटीस दिनांक: १०/०४/२०२६
भौतिक ताबा दिनांक: १७/०६/२०२६

### मालमत्तेचे वर्णन

एकलहरे (तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर – ४१३७१५ येथील जिल्हा परिषद अहमदनगरच्या हद्दीतील, गट क्र. ६९/२ (क्षेत्रफळ ०० हेक्टर ०६ आर) आणि गट क्र. ६९/२ (एकूण क्षेत्रफळ १८ हेक्टर ५० आर) तसेच जीपीएच अनुक्रमांक ९३ आणि जीपीएच क्रमांक ३८१ या जमिनींवरील संपूर्ण बांधकामासह असलेली मालमत्ता.
गट क्र. ६९/२ च्या चतु:सीमा: पूर्व – गट क्र. २३/३, दक्षिण – गट क्र. ६९/२, पश्चिम – टिळकनगर इंडस्ट्रीजकडे जाणारा रस्ता, उत्तर – गट क्र. ६९/१.

ठिकाण : अहिल्यानगर
दि. १९.०६.२०२६

सही/–ट्रूहोम फायनान्स लिमिटेड
(पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)


# केडगावमध्ये जुन्या वादातून कुटुंबाला कुऱ्हाडीच्या दांड्याने बेदम मारहाण, ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – केडगाव परिसरातील कोतकर मळा येथे जुन्या वादातून दोन कुटुंबात भीषण हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. ११ जणांनी एका कुटुंबातील चौघांना कुऱ्हाडीच्या दांड्याने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ज्ञानेश्वर यादव कोतकर (वय ३१, रा. केडगाव) हे २१ जून रोजी रात्री आपल्या घराबाहेर उभे असताना ही घटना घडली. आरोपी सहदेव किसन कोतकर, महादेव किसन कोतकर, सागर महादेव कोतकर, शुभम महादेव कोतकर, नंदा सहदेव कोतकर, वैभव खामकर आणि निलेश मोढवे यांच्यासह इतर तीन अनोळखी लोकांनी मिळून ज्ञानेश्वर यांना विनाकारण गाठले. आरोपींनी जुन्या कारणावरून वाद उकरून काढत ज्ञानेश्वर यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. हा वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर आरोपींनी हातातील कुऱ्हाडीच्या लाकडी दांडक्याने आणि काठीने ज्ञानेश्वर यांच्यावर जोरदार हल्ला चढवून त्यांना गंभीर जखमी केले. यावेळी पतीला वाचवण्यासाठी धावून आलेल्या त्यांच्या पत्नीलाही आरोपींनी लाकडी काठीने बेदम मारहाण केली. या गोंधळात ज्ञानेश्वर यांच्या आईला आणि भावाला देखील आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. ज्ञानेश्वर कोतकर यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस उपनिरीक्षक गोविंद गोल्हार करत आहेत.

# येत्या ८ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करावा अन्यथा अधिकाऱ्यांना तोंडाला काळे फासणार

नगर – शहरातील विस्कळीत झालेल्या पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. संग्राम जगताप यांनी तातडीने दखल घेत महापालिकेतील आयुक्तांच्या दालनात महावितरण कार्यालय, पाणीपुरवठा विभाग आणि नगरसेवकांची संयुक्त बैठक आयोजित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या दालनात ही बैठक झाली. बैठकीत नगरसेवकांनी महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत शहरातील वीजपुरवठा आणि पाणीपुरवठ्याच्या समस्यांबाबत नाराजी व्यक्त केली.

यावेळी नगरसेवकांनी इशारा देत सांगितले की, येत्या आठ दिवसांत वीज वितरण व्यवस्था सुरळीत करून शहराचा पाणीपुरवठा नियमित करावा, अन्यथा महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा मार्ग अवलंबावा लागेल.

या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, कुमारसिंह वाकळे, अमोल गाडे, नगरसेवक निखिल वारे, प्रकाश भागानगरे, बाळासाहेब पवार, संजय चोपडा, महेश लोंढे, अजिंक्य बोरकर, सुरेश बनसोडे, सतीश शिंदे, संजय ढोणे, गोरख पडोळे, महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, पाणीपुरवठा विभागाचे अभियंता गणेश गाडळकर आदी उपस्थित होते.

**महावितरण व पाणीपुरवठा विभागाच्या बैठकीत नगरसेवकांचा महावितरण अधिकाऱ्यांना इशारा**


शहरातील पाणी प्रश्नावर महापालिकेत महावितरण व पाणीपुरवठा विभागाची बैठक झाली.

बैठकीदरम्यान नगरसेवकांनी विविध प्रश्न उपस्थित करत महावितरण विभागावर तीव्र टीका केली. त्यांनी सांगितले की, महावितरण कार्यालयाकडून वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात असल्यामुळे मुळा धरण येथून होणारा पाणीपुरवठा वारंवार बंद पडतो. परिणामी संपूर्ण शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत होत असून नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना सुनावत म्हटले की, महावितरण विभागाने आपली प्रलंबित कामे एकदाच पूर्ण करून घ्यावीत. येत्या शनिवारी आवश्यक शटडाऊन घेऊन सर्व दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत आणि सोमवारपासून वीजपुरवठा सुरळीत करावा. वर्षानुवर्षे एकाच कामांच्या नावाखाली नागरिकांना वेठीस धरणे योग्य नाही. ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने आर्थिक फायद्यासाठी कामे लांबवली जात असल्याची नागरिकांमध्ये भावना निर्माण झाली आहे.

नगरसेवकांनी पुढे सांगितले की, महावितरण विभाग महापालिकेकडून दरमहा सुमारे दीड कोटी रुपयांचे वीजबिल वसूल करतो. एवढी मोठी रक्कम घेऊनही नागरिकांना दर्जेदार सेवा देता येत नसेल तर त्याचा जाब द्यावा लागेल. नागरिकांकडून वीजबिल थकल्यास तत्काळ वीजपुरवठा खंडित केला जातो, मग सेवा पुरविण्याची जबाबदारी महावितरणची नाही का?

बैठकीत नगरसेवकांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, यापुढे कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित करण्यात आला अथवा शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटना घडल्या, तर आम्ही शांत बसणार नाही. नागरिकांच्या रोषाला आम्हालाच सामोरे जावे लागते. त्यामुळे महावितरण विभागाने आपली जबाबदारी ओळखून तातडीने उपाययोजना कराव्यात. अन्यथा अधिकाऱ्यांना काळे फासण्याचे आंदोलन करण्यात येईल.


## महाराष्ट्र शासन,
## सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, नाशिक

दुरध्वनी क्रमांक ०२५३–२५७८०१२ mahapwd.gov.in/https://pay to pwd

### निविदा सुचना क्रमांक /०५ / सन २०२६–२७

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता सा.बां.विद्युत विभाग नाशिक दुरध्वनी क्रमांक ०२५३– २५७८०१२ हे खालील संकेतस्थळावर नमूद केलेल्या ब–१ नमुन्यातील निविदा गेट वे पेमेंट निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून निविदा मागवित आहेत.

वरील निविदेत १५ कामे समाविष्ट असून या निविदेवरील संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे.www.mahapwd.gov.in, https://paytopwd.com

या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांनी नोंद घ्यावी.

जा.क्र.काअना/निविदा–२/९९२/सन २०२६.
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,सा.बां.विद्युत विभाग, ग्रीन बिल्डींग,
२ रा मजला, उंटवाडी रोड, सा.बां. परिसर, नाशिक.
E-mail - elnashikee@mahapwd.gov.in,
दिनांक : १५/०६/२०२६)

कार्यकारी अभियंता,
सा.बां. विद्युत विभाग,
नाशिक.

विमाका/नाशिक/जाहिरात/६०/२०२६


## वायर आणि ऑईलची चोरी

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केंद्रीय विद्यालय क्र. १ च्या परिसरामधून अज्ञात चोरट्याने सरकारी विद्युत ट्रान्सफॉर्मर उघडून त्यातील हजारो रुपयांची कॉपर वायर आणि ऑईल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत असिस्टंट गॅरिसन इंजिनिअर नरेंद्र कुमार मीना (वय ३८, सद्या रा. नॉर्थनगर पाथर्डी रोड, मूळ रा. राजस्थान) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या अधिपत्याखालील केंद्रीय विद्यालय क्र. १ च्या परिसरातील विद्युत ट्रान्सफॉर्मर (१०० केव्ही) २२ जून रोजी पहाटेच्या सुमारास चोरट्याने खोलला. चोरट्याने ट्रान्सफॉर्मरमधील ८० किलो कॉपरची (तांब्याची) तार आणि १५० लीटर ऑईल असा एकूण ९० हजार रुपये किमतीचा सरकारी माल चोरून नेला. ही बाब निदर्शनास आल्यावर याबाबत फिर्याद देण्यात आली. या फिर्यादी वरून पोलिसांनी बीएनएस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


## आनंदऋषीजी योगा सेंटर
### आनंदयोगमधील योग साधकांचे अभिप्राय

मी मागील आठ वर्षापासून अनिल मेहेर सरांच्या मार्गदर्शनाखाली आनंदऋषीजी योगा सेंटरध्ये सहभागी आहे.

‘योग ही एक जादू आहे.’ ही जादू मी मागील आठ वर्षापासून अनुभवत आहे. योगामुळे माझ्या जीवनात आमुलाग्र बदल झाले आहेत. सातत्यपूर्ण योग केल्यामुळे माझी शारिरीक लवचिकता आणि ताकद वाढली आहे. यामुळे मला मानसिक शांतता आणि उत्तम एकाग्रता मिळाली आहे. प्रत्येक दिवशी मला नवीन काहीतरी शिकायला मिळते.

आनंद योग वर्गात नेहमी नवनीवन संकल्पना राबविल्या जातात. त्यामध्ये योग, प्राणायाम, हास्य, झुंबा घेतले जातात. श्री. मेहेर सरांकडून मला झुंबा साठी प्रोत्साहन मिळाले. माझ्या मनातील भिती कमी झाली. आणि तेव्हापासून आजपर्यंत मी नवनवीन प्रयोग करुन सर्वांसाठी नवीन प्रकार घेत आहे. मला डिलेव्हरीनंतर कंबरदुखीचा त्रास चालू झाला होता. औषध घेतल्याशिवाय मला काम करता येत नव्हते. परंतु आठ वर्षापासून मी योग वर्गात सहभागी झाल्यापासून तो त्रास पूर्णपणे बंद झाला आणि आता मी एकही गोळी घेत नाही.

सातत्यपूर्ण योग केल्यामुळे मी व माझे कुटुंब निरोगी, आनंदी जीवन जगत आहे. योगामुळे सकारात्मक दृष्टीकोन मिळतो. योग हे औषधाशिवाय आरोग्य राखण्याचे साधन आहे. योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारी एक जीवनशैली आहे. आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात योगाचे महत्व अधिकच वाढले आहे. आमच्याकडून अतिशय शिस्तीने आणि सातत्यपूर्ण नियमित योग करुन घेणारे आमचे योग प्रशिक्षक अनिल मेहेर यांची मी नेहमीच ऋणी राहील.



**– सौ.उज्वला नवले,** ब्राह्मणगल्ली, माळीवाडा

